७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. २६ जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १८१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

# विषारी दारू प्रकरणी दोषींवर मोक्का

मुंबई (दै. संध्या)

■ मृतांच्या सर्व २२ कुटुंबांना प्रत्येकी ५ लाखांची मदत

■ आमदार अमित गोरखे यांच्या लक्षवेधीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लिखित उत्तर

■ गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सभागृहात केली महत्त्वपूर्ण घोषणा



पुणे व पिंपरी-चिंचवडमधील दापोडी, फुगेवाडी आणि हडपसर परिसरात घडलेल्या अत्यंत दुर्दैवी विषारी दारू प्रकरणावर आमदार अमित गोरखे यांनी महाराष्ट्र विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेद्वारे प्रकाश टाकला. या गंभीर विषयाची दखल घेत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर लिखित उत्तर सभागृहात सादर केले असून त्यावर गृहराज्यमंत्री मा. नामदार योगेश कदम यांनी शासनाची भूमिका स्पष्ट करत कठोर कारवाई व महत्त्वपूर्ण निर्णयांची घोषणा केली.

आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई, मृतांच्या कुटुंबांना आर्थिक मदत, मिथेनॉल पुरवठा साखळीचा संपूर्ण तपास आणि राज्यातील अवैध दारू व्यवसायाविरोधात व्यापक मोहीम राबविण्याची मागणी केली. त्यांच्या या मागण्यांची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लिखित उत्तरामध्ये तपासाची सद्यस्थिती, दोषींवरील कारवाई तसेच भविष्यातील प्रतिबंधात्मक उपाययोजनांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लिखित उत्तरानुसार या संपूर्ण प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला असून विषारी दारू निर्मितीसाठी वापरण्यात आलेल्या मिथेनॉलचा पुरवठा करणाऱ्या मुख्य आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवरही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सभागृहात सांगितले की, या प्रकरणातील मुख्य आरोपींवर मोक्का (MCOCA) अंतर्गत कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दोषींना कोणतीही सवलत दिली जाणार नाही आणि संपूर्ण रॅकेट उद्ध्वस्त करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

याशिवाय विषारी दारूमुळे मृत्यू झालेल्या सर्व २२ कुटुंबांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार असून एकूण १ कोटी १० लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. पीडित कुटुंबांना तातडीचा दिलासा मिळावा यासाठी शासनाने ही मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या लिखित उत्तरात राज्यभर अवैध दारू निर्मिती, वाहतूक व विक्री रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले असून तालुकास्तरीय दारूबंदी समित्यांचे पुनर्गठन, पोलिस व उत्पादन शुल्क विभागाच्या संयुक्त कारवाया आणि मिथेनॉलच्या वाहतुकीवर अधिक कठोर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने ठोस पावले उचलल्याचे नमूद केले आहे.

यावेळी आमदार अमित गोरखे म्हणाले, "विषारी दारूमुळे २२ निष्पाप नागरिकांचा मृत्यू ही अत्यंत वेदनादायी आणि संतापजनक घटना आहे. मृतांच्या कुटुंबांना न्याय मिळावा, दोषींना कठोर शिक्षा व्हावी आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी मी सभागृहात ठाम भूमिका मांडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेत लिखित उत्तराद्वारे कठोर कारवाई व मदतीबाबत भूमिका स्पष्ट केली असून शासनाने घेतलेले निर्णय पीडित कुटुंबांसाठी दिलासादायक आहेत."

पुढे आमदार अमित गोरखे म्हणाले, "दोषींना शिक्षा होईपर्यंत आणि पीडितांना पूर्ण न्याय मिळेपर्यंत या प्रकरणाचा पाठपुरावा सुरूच राहील. राज्यातील अवैध दारू व्यवसायाचे संपूर्ण उच्चाटन व्हावे यासाठी शासनाने सातत्याने कठोर भूमिका घ्यावी, हीच जनतेची अपेक्षा आहे."

## कायद्यापुढे सर्व समान

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणाचेही नाव न घेता, धमक्या देणारे कोणत्याही पक्षाचे असोत, कायद्यापुढे सर्व समान आहेत, असा संदेश दिला. राज्यात भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात पोलिस प्रशासन कठोर पावले उचलेल, असेही त्यांनी नमूद केले. अलीकडेच खासदार संजय दिना पाटील यांच्या काही वक्तव्यांवरून राजकीय वर्तुळात मोठा वाद निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांना पत्र लिहून कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनीही कायदा-सुव्यवस्थेच्या बाबतीत सरकार कोणतीही तडजोड करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.



# नागपूर मेट्रो टप्पा-२ विस्तारास व सागरी सेतू-वांद्रे किल्ला कनेक्टरला मान्यता

मुंबई (दै. संध्या)

■ मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समिती बैठक

■ नागपूर व मुंबईतील दोन प्रकल्पांना मंजुरी

नागपूर मेट्रो रेल टप्पा २ अंतर्गत कन्हान नदी ते कन्हान शहर या दरम्यान विस्तारीत उन्नत मेट्रो मार्गिका उभारण्यास तसेच मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतू वांद्रे किल्ल्याशी जोडण्यासाठी कनेक्टर उभारण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात पायाभूत सुविधा समितीची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतूपासून वांद्रे किल्ल्यापर्यंत अतिरिक्त जोडरस्ता तयार करण्यात येणार आहे. यासाठी १७२२.४० कोटी रुपयांचा प्रस्ताव पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मांडण्यात आला होता. हा जोडरस्ता सागरी सेतूपासून वांद्रे किल्याजवळ जोडली जाणार असून तो ३.५५ किमी लांबीचा असणार आहे. या कनेक्टरमुळे २० ते ४५ मिनिटांचा प्रवास हा १० मिनिटांपर्यंत येणार आहे. या जोडरस्त्याचे काम महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. नागपूर जिल्ह्यातील कन्हान परिसरातील सार्वजनिक वाहतूक मजबूत करण्यासाठी नागपूर मेट्रो रेल टप्पा-२ अंतर्गत कन्हान नदी ते कन्हान शहर या उन्नत विस्तारीत मेट्रो रेल्वे मार्गिकेस मान्यता देण्यात आली. ही मार्गिका सुमारे १.४० कि.मी. असून त्यावर १ उन्नत स्थानक असणार आहे. एकूण रु. ३१०.३५ कोटी इतक्या प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या या प्रकल्पाची अंमलबजावणी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) मार्फत करण्यास मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पास केंद्रशासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

## ढिंग-टांग




# पाटलांची दिलगिरी

**मुंबई (दै. संध्या) :** ठाकरे गटाला सोडून नुकतेच शिवसेनेत प्रवेश केलेल्या खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी दिली. यापुढे आलात तर मारून सोडतो, असे संजय दिना पाटील म्हणाल्याची व्हिडीओ क्लिप सगळीकडे व्हायरल झाली आहे. हा प्रकार समोर आल्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील याबाबत आपली नाराजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे बोलून दाखवल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. राज्यभरात संजय दिना पाटील यांच्याविरोधात आंदोलन केले जात आहे. दरम्यान, आता संजय दिना पाटील यांनी समोर येऊन घडलेल्या प्रकाराबाबत जाहीर माफी मागितली आहे. संजय दिना पाटील यांनी एका व्हिडीओच्या माध्यमातून पत्रकार बांधवांची माफी मागितील आहे. माझ्याकडून चुकीचे शब्द वापरले गेले, असे संजय दिना पाटील म्हणाले आहेत. माझ्यात आणि पत्रकारांमध्ये जो प्रकार झाला त्यासाठी मी मनापासून दिलगिरी व्यक्त करतो. हा प्रकार का घडला ते सांगतो. मी ज्या दिवसापासून शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्या दिवसापासून मला शिवीगाळ करून माझा अपमान केला जात आहे. मी अपमान सहन केला. तरीसुद्धा आज सकाळी काही पत्रकार मित्र आले होते. मला माझ्या पक्षप्रवेशबद्दल काहीही विचारू नका. मला जे काही बोलायचे होते, ते बोलून झालं आहे. कृपा करून काही बोलू नका, अशी विनंती मी त्यांना हात जोडून केली, असे सुरुवातीला संजय दिना पाटील यांनी सांगितले.

# राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त २६ जूनला ‘जागर समतेचा’

**मुंबई (दै. संध्या) :** सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त ‘जागर समतेचा’ या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार, २६ जून २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता राजर्षी शाहू सभागृह, छत्रपती शिवाजी नाट्य मंदिर इमारत, दादर (प.), मुंबई येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमात विष्णू शिंदे आणि सहकलाकार समता, सामाजिक परिवर्तन आणि मानवतेचा संदेश आपल्या प्रभावी कलासादरीकरणातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचविणार आहेत. राजर्षी शाहू महाराज हे सामाजिक न्याय, समता, शिक्षणाचा प्रसार आणि सर्वसमावेशक समाजव्यवस्थेचे प्रणेते होते. शिक्षण, आरक्षण, सामाजिक सुधारणा आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य भारतीय समाजजीवनात अतुलनीय मानले जाते. त्यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ‘जागर समतेचा’ हा कार्यक्रम राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांना आणि कार्याला कलात्मक अभिवादन करणारा उपक्रम आहे. लोककला, गीत, संगीत आणि प्रभावी सादरीकरणाच्या माध्यमातून समता, बंधुता, सामाजिक ऐक्य आणि मानवतेचा संदेश रसिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.





फुटलेल्या खासदारांना ८०-९० कोटी कॅश आणि २५० कोटींचा निधी; ओमराजेंनाही लगावला टोला!

# रोहित पवारांचा ‘ऑपरेशन टायगर’वर मोठा बॉम्ब!

**धाराशिव (दै. संध्या) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील 9 पैकी तब्बल 6 खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करत महाविकास आघाडीला मोठा धक्का दिला आहे. या 'ऑपरेशन टायगर'वरून राजकारण तापलेले असताना, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) युवा आमदार रोहित पवार यांनी एक खळबळजनक दावा केला आहे. "ऑपरेशन टायगरच्या नावाखाली फुटलेल्या प्रत्येक खासदाराला 80 ते 90 कोटी रुपये कॅश आणि अडीचशे कोटी रुपयांचा विकास निधी देण्यात आला आहे," असा थेट आरोप रोहित पवार यांनी केला आहे. तसेच, धाराशिवमधील सभेत त्यांनी खोटी शपथ घेण्याच्या मुद्द्यावरून स्थानिक खासदार ओमराजे निंबाळकर यांचे नाव न घेता त्यांच्यावरही निशाणा साधला आहे.



धाराशिव येथे पत्रकारांशी बोलताना रोहित पवार यांनी शिंदे गटाच्या 'ऑपरेशन टायगर'ची खिल्ली उडवली. ते म्हणाले, "खासदार असेच गोडीत फुटलेले नाहीत. आम्हाला सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, 60 ते 90 कोटी रुपये कॅश आणि दरवर्षी अडीचशे कोटींचा विकास निधी प्रत्येक खासदाराला दिला जाणार आहे. या विकास निधीतून 15 ते 20 टक्केवारी कॉन्ट्रॅक्टरकडून घेतली जाईल आणि त्यातून तो निधी मिळणार आहे. हे सर्व नेते फक्त पैशासाठी गेले आहेत. हे कोणतेही 'ऑपरेशन टायगर' नसून डी-लिमिटेशनसाठी भाजपने मांडलेला हा 'ऑपरेशन बाजार' आहे." भाजपमधील अंतर्गत कलहावर रोहित पवार म्हणाले, "राज्यातील आणि केंद्रातील भाजपमध्ये सध्या वाद सुरू आहे. केंद्रातील भाजप एकनाथ शिंदे यांना बळ देत आहे, तर राज्यातील भाजप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ताकद देत आहे. यामुळेच फडणवीस हे एकनाथ शिंदे यांची अडवणूक करत आहेत. एकनाथ शिंदे यांनी आर्थिक बळ लावल्यामुळेच हे खासदार फुटले असावेत," असा दावाही त्यांनी केला. "भाजपला अजून 40 खासदारांची गरज आहे, पण ते मिळतील असे वाटत नाही. 2029च्या लोकसभेला आपण निवडून येणार नाही, हे माहीत असल्याने खासदार फोडून डी-लिमिटेशन करण्याचा भाजपचा हा केविलवाणा प्रयत्न आहे." शिंदे गटाच्या ऑपरेशन टायगरनंतर आता 'ऑपरेशन तुतारी' राबवले जाणार असून शरद पवार गटाचे खासदारही फुटणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. यावर ठामपणे उत्तर देताना रोहित पवार म्हणाले, "राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षातून आमचा कोणताही आमदार किंवा खासदार फुटणार नाही. ही केवळ चर्चा आहे," असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. यानंतर धाराशिव येथे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना रोहित पवार यांनी शिवसेनेतून शिंदे गटात गेलेले स्थानिक नेते आणि मंत्री तानाजी सावंत यांच्यावर टीका केली. तसेच, नाव न घेता ठाकरे गटाचे विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावरही प्रहार केला. रोहित पवार म्हणाले, "मी शपथ घेऊन सांगतो की आम्ही खोटी शपथ कधीच घेत नाही. तुळजाभवानी आईचे दर्शन घेऊन आपण वर्षभर लढायची प्रेरणा घेतो, पण या भागामध्ये काही लोक आईची खोटी शपथ घेऊन फुटत असतील, विचार बदलत असतील, तर ते लोकांना पटणार नाही." त्यांनी ओमराजे निंबाळकरांकडे अंगुलीनिर्देश केल्याची चर्चा सुरू झाली आहे. रोहित पवार पुढे म्हणाले, “या जिल्ह्यात आजपर्यंत 'तू मार, मी रडतो; मी मारतो, तू रड' असे दोन भावांचे राजकारण चालले आहे. या दोन परिवारांच्या राजकारणाच्या नादात हे परिवार मोठे झाले, पण हा जिल्हा मात्र गरीब राहिला. पण येत्या 2029 मध्ये लोक सामान्य परिवारातल्या उमेदवाराला नक्की ताकद देतील. लोकांनी त्यांना हिरो बनवलं होतं, पण आता विचारांची आणि भूमिकेची अदलाबदल केल्यामुळे तेच नेते लोकांसमोर झिरो झाले आहेत."



# संपादकीय

## पीओकेच्या जळत्या घरात वारा!

पाकिस्तानने काश्मीरसाठी जन्मापासूनच भारतासोबत उभा दावा मांडला. चार युद्धे लढली. रक्त सांडले. मिळेल त्या आंतरराष्ट्रीय मंचावर गळे काढले. त्या सगळ्याचा पाया एका वाक्यात खिळखिळा करण्याचे काम पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी नुकतेच केले. पाकव्याप्त काश्मीर (पीओके)मध्ये सध्या सुरू असलेल्या आंदोलनावर भाष्य करताना, तेथील रहिवासी 'अस्सल काश्मिरी' नसून 'पहाडी' आणि 'पोटोहारी' भाषा बोलणारे आहेत, असे त्यांनी म्हटले. हे विधान केवळ एका मंत्र्याचे मत म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही; कारण त्यातून पाकिस्तानच्या आठ दशकांपासूनच्या काश्मीरविषयक भूमिकेतील मूलभूत विरोधाभास उघड झाला आहे. पाकिस्तानने नेहमीच स्वतःला 'काश्मिरी जनतेचा संरक्षक' म्हणून सादर केले. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर काश्मिरी जनतेच्या हक्कांसाठी लढत असल्याचा दावा केला; परंतु, जर पीओकेमधील लोक काश्मिरीच नसतील, तर पाकिस्तान नेमका कोणाच्या नावाने संघर्ष करीत आहे, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. ख्वाजा आसिफ यांनी पाकिस्तानच्या अधिकृत कथनाच्या पायावरच कुऱ्हाड चालवली आहे. वास्तविक, पाकव्याप्त काश्मीर हा नैसर्गिक सौंदर्यासोबतच, सांस्कृतिकदृष्ट्या विविधतेने नटलेला प्रदेश आहे. 'आझाद काश्मीर' आणि 'गिल्गिट-बाल्टिस्तान' या भागांमध्ये पोटोहारी, पहाडी, गुजरी, शिना, बल्ती अशा विविध भाषा बोलल्या जातात. पाकिस्तानने गेली ७९ वर्षे या वास्तवाकडे दुर्लक्ष करून, संपूर्ण प्रदेशाला काश्मिरी अस्मितेच्या चौकटीत बसविण्याचा प्रयत्न केला आणि आज त्याच देशाच्या संरक्षणमंत्र्यांनी त्या दाव्याला छेद दिला आहे. सध्या पीओकेमध्ये तीव्र जनआंदोलने सुरू आहेत. अनेक ठिकाणी आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये संघर्ष झाला असून, गोळीबाराच्या घटनांनी परिस्थिती अधिक चिघळली आहे. अनेक काश्मिरी नागरिक पाक लष्कराच्या गोळ्यांना बळी पडल्याचे वृत्त आहे.

काश्मिरी जनतेच्या हक्कांसाठी जगभर गळे काढणाऱ्या पाकिस्तानला आज त्याच प्रदेशातील जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. हा विरोधाभास पाकिस्तानच्या नैतिक आणि राजकीय दिवाळखोरीचे प्रतीकच! गंभीर बाब म्हणजे, पाक सरकारने आंदोलकांवर कारवाईसाठी लष्कराला खुली सूट दिली आहे. त्यात ख्वाजा आसिफ यांचे वक्तव्य म्हणजे जळत्या घरात वाराच म्हणावे लागेल. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारताची भूमिका अधिक ठळकपणे समोर येते. भारत सरकारची अधिकृत भूमिका सुरुवातीपासून स्पष्ट आहे, की जम्मू-काश्मीरसोबतच पाकव्याप्त काश्मीरही भारताचा अविभाज्य भाग आहे आणि तेथील नागरिकही भारतीयच आहेत. ख्वाजा आसिफ यांनी अप्रत्यक्षपणे पाकिस्तानच्या दाव्यातील पोकळपणा उघड केला आहे. त्यामुळे भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली भूमिका अधिक प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळू शकते. भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काही दिवसांपूर्वी केलेले विधान यासंदर्भात उल्लेखनीय ठरते. पाकव्याप्त काश्मीर मिळविण्यासाठी बलप्रयोगाची आवश्यकता नाही; तेथील नागरिक स्वतःहून भारतात सामील होण्याची इच्छा व्यक्त करतील, असे त्यांनी म्हटले होते. पीओकेतील वाढती अस्वस्थता आणि पाकिस्तानविषयीचा रोष लक्षात घेतल्यास, त्यामध्ये निश्चितच तथ्य दिसते. पीओकेतील घडामोडींकडे बघताना, जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही वर्षांत झालेले बदलही लक्षात घ्यावे लागतील. कलम ३७० रद्द झाल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये हिंसाचार वाढेल, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. प्रत्यक्षात मात्र दहशतवादी कारवायांचे प्रमाण कमी होऊन पर्यटनाला चालना मिळाली, पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना वेग आला आणि गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. अलीकडेच काँग्रेस नेते शशी थरूर यांनीही काश्मिरात स्थिती सामान्य असल्याचे प्रमाणपत्र दिले. अर्थात, सर्व समस्या संपलेल्या नाहीत. अजूनही अनेक आव्हाने आहेत; परंतु, जम्मू-काश्मीरमध्ये स्थैर्य आणि विकासाची प्रक्रिया सुरू असल्याचे नाकारता येत नाही. एका बाजूला भारताच्या जम्मू-काश्मीरमध्ये विकास, पर्यटन आणि स्थैर्याची प्रक्रिया दिसत आहे; तर दुसऱ्या बाजूला पाकव्याप्त काश्मीरमध्ये असंतोष, आंदोलन आणि दडपशाहीच्या तक्रारी ऐकू येत आहेत.

## संस्कृत सुभाषित

प्रमदा मदिरा लक्ष्मी विज्ञेया त्रिविधा सुरा।
दृष्टैन्मादयत्येका पीता चान्यातिसंचयात्।।

मद्याची तीन रूपे आहेत. सुंदर स्त्री, मदिरा आणि संपत्ती ही मदिरेचीच तीन रूपे आहेत. सुंदर स्त्रीच्या दर्शनाने मद चढतो, मदिरेच्या प्राशनाने मद चढतो आणि धनाचा संचय केल्यामुळेही मद चढतो.

## गुरु वचन

### सर्वांप्रती समान भाव असावा

एक स्वामी शारीरिक प्रकृतीने खूपच कमजोर होते. परंतु दररोज गंगास्नानाशिवायही इतरही काम ते करायचे. नदीच्या काठावर त्यांना खूप अडचण येत असे यासाठी स्नानाच्यावेळी ते ब्राह्मणाची मदत घेत होते व नंतर परतताना कोणत्याही जातीच्या व्यक्तीच्या खांद्यावर हाथ ठेऊन वरती येत होते. स्वामींच्या या वागणुकीला तेथील साधू-संत चांगले मानत नव्हते. व त्यांनाही काही म्हणू शकत नव्हते.

एकावेळी एका शिष्याने स्वामीजीला विचारले की, आपल्या गंगा स्नानाचा काय फायदा, आपण स्नान करण्यासाठी ब्राह्मण लोकांची मदत घेतात आणि परतताना इतर कोणत्याही जातीच्या व्यक्तीची. यामुळे तर स्नान केल्यानंतरही अपवित्र होते. स्वामीजी शिष्याला म्हणाले, वत्सा हा तुझा भ्रम आहे. स्नानामुळे तर केवळ माझ्या शरीराचा वरील मळ साफ होतो. शरीरातील मळ तर तसाच राहतो आणि तो मळ त्या व्यक्तीसोबत येण्याजाण्याने साफ होतो. ज्याला तू कनिष्ठ जातीचा समजतोस. स्वामीजींचे हे म्हणणे ऐकून शिष्य म्हणाला, मला काही समजले नाही. तेव्हा स्वामीजी म्हणाले, वत्सा मी मानवामानवात अंतर समजत नाही. माझ्यासाठी सर्व जाती-संप्रदाय समान आहेत. मी त्या कनिष्ठ जातींच्या लोकांना जवळ करुन संदेश देऊ इच्छित आहे आणि असे केल्यामुळे मन शुद्ध होते. दुसऱ्यापेक्षा आपण मोठे असल्याचा भाव मनात अहंकार निर्माण करतो आणि हा अहंकार मनुष्याच्या प्रगतीचा सर्वात मोठा अडथळा आहे. तोपर्यंत मनाचा अहंकार नष्ट होत नाही. तोपर्यंत मनुष्य कधीही शुद्ध होऊ शकत नाही. कोणी लहान-मोठे नसते तर केवळ मनाचा भाव आपल्याला लहान-मोठा बनवतो आणि लहान-मोठा भेदभाव नष्ट करणे हा माझा उद्देश आहे. स्वामीजीचे हे वचन ऐकून शिष्य त्यांच्या मार्गाने चालू लागला.

## उपदेशकथा

### वस्त्रे बदलली

एके दिवशी समुद्राच्या किनाऱ्यावर अध्यात्म आणि कर्मकांड यांची गाठ पडली. दोघे एकमेकांना म्हणाले, 'आपण समुद्रात स्नान करूया' त्याप्रमाणे दोघांनी आपआपले कपडे काढून ठेवले आणि मनसोक्त जलविहार केला. थोड्या वेळाने कर्मकांड किनाऱ्यावर आधी परत आले. नकळत त्याने अध्यात्माचे कपडे घातले आणि आपल्या मार्गाने ते निघून गेले. नंतर अध्यात्म समुद्रातून बाहेर आले. पाहते तर आपले कपडे दिसेनात. बरे, कपड्यांशिवाय कसे वावरायचे म्हणून कर्मकांडाचे कपडे घालून अध्यात्म आपल्या मार्गाने निघून गेले. या अदलाबदलीचा परिणाम असा झाला की, आजही समाजामध्ये कर्मकांडाला लोक अध्यात्म समजतात आणि अध्यात्म एक कर्मकांडच बनून गेले आहे पण काही थोडी माणसे अशी आढळतात की, वेषाकडे लक्ष न देता त्यांना अध्यात्माची ओळख बरोबर पटते.

कथा उपदेश : पाणी आणि दूध यातील फरक आपण जाणला पाहिजे.



## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:बव ०९:१४:३६ |
| २६ जून २०२६ | करण:बालव २२:२२:३२ |
| शुक्रवार | सूर्य:मिथुन |
| विक्रम संवत्- २०८२ | चन्द्र:वृश्चिक१२:३२:४८ |
| निज ज्येष्ठ संवत्- १९४८ | हिजरी सन् - १४४८ |
| संवत्सर - पराभवनाम | मुस्लिम मास - मोहरम |
| अयन- दक्षिणयन | तारीख - १० |
| मास- निज ज्येष्ठ | विशेष |
| ऋतु- सौर ग्रीष्म | छत्रपती शाहू महाराज जयंती |
| शुक्ल पक्ष | मोहरम (ताजिया) |
| तिथि:द्वादशी २२:२२:३२ | धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती (तिथीप्रमाणे) |
| नक्षत्र:विशाखा १९:१५:३२ | |
| योग:सिद्ध ११:३८:०९ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९९२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | 2 | | 9 | | 3 | | 1 |
| | 7 | 8 | 3 | | | 9 | | |
| 9 | | | 4 | 6 | | | | |
| | | | | | 3 | 6 | | 2 |
| | 3 | | 5 | | 6 | | 7 | |
| 8 | | 6 | 7 | | | | | |
| | | | | 3 | 5 | | | 7 |
| | | 1 | | | 8 | 2 | 6 | |
| 7 | | 5 | | 1 | | 8 | 9 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९९१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 2 | 5 | 6 | 7 | 3 | 1 | 8 | 4 |
| 4 | 1 | 7 | 8 | 2 | 9 | 5 | 3 | 6 |
| 6 | 3 | 8 | 1 | 5 | 4 | 9 | 2 | 7 |
| 3 | 7 | 2 | 5 | 6 | 1 | 8 | 4 | 9 |
| 1 | 9 | 4 | 7 | 3 | 8 | 2 | 6 | 5 |
| 8 | 5 | 6 | 4 | 9 | 2 | 3 | 7 | 1 |
| 2 | 6 | 1 | 3 | 4 | 5 | 7 | 9 | 8 |
| 7 | 8 | 9 | 2 | 1 | 6 | 4 | 5 | 3 |
| 5 | 4 | 3 | 9 | 8 | 7 | 6 | 1 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०३६३ – रोमन सम्राट ज्युलियनचा मृत्यू. जोव्हियन सम्राटपदी.
- ०६८४ – बेनेडिक्ट दुसरा पोप पदी.
- १४८३ – रिचर्ड तिसरा इंग्लंडच्या राजेपदी.
- १७२३ – रशियन सैन्याने अझरबैजानची राजधानी बाकु जिंकली.
- १८०७ – लक्झेम्बर्गमध्ये गोदामावर वीज पडून २३० ठार.
- १८१९ – सायकलचा पेटंट देण्यात आला.
- १९२४ – अमेरिकेच्या सैन्याने डॉमिनिकन प्रजासत्ताकमधून माघार घेतली.

### राष्ट्रीय

- १९५८ – पुणे महापालिकेचा कारभार मराठीतून सुरू
- १९६८ – बालगंधर्व रंगमंदिराचे उद्घाटन.
- १९७५ – तत्कालीन भारतीय राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांनी आणीबाणी जाहीर करण्याच्या वटहुकमावर स्वाक्षरी केली.

### जन्म

- १८३८ – बंकिमचंद्र चटर्जी, आद्य बंगाली कादंबरीकारचा जन्म.
- १८५४ – रॉबर्ट लेर्ड बोर्डेन, कॅनडाचा आठवा पंतप्रधानचा जन्म.
- १८७४ – शाहू महाराजचा जन्म.
- १८८८ – नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व, मराठी रंगभूमीवरील अभिनेते, गायकाचा जन्म.

### निधन

- ०३६३ – ज्युलियन, रोमन स्म्राटचे निधन.
- १५४१ – फ्रान्सिस्को पिझारो, स्पॅनिश कॉंकिस्तादोरचे निधन.
- १९२२ – आल्बर्ट पहिला, मोनॅकोचा राजाचे निधन.
- १९४४ – प्रफुल्लचंद्र रे, भारतीय रसायनशास्त्रज्ञाचे निधन.

## : SMS :

5 Reasons Why
"YOU" are my Friend:
1.
2.
3.
4.
5.
No Reason.
Bas meri mat
maari gai c.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २६ | २४ |
| अहमदनगर | ३०.४ | २३.४ |
| अकोला | ३५.३ | २६.४ |
| अमरावती | ३६.१ | २६.३ |
| बीड | ३९.८ | २७.६ |
| भंडारा | ३९.५ | २७.१ |
| बुलढाणा | ४२.२ | ३० |
| चंद्रपूर | ३९ | २७.५ |
| चेन्नई | ४०.८ | ३१.५ |
| नवी दिल्ली | ४१.२ | ३३.७ |
| धुळे | ३३.३ | २७ |
| गोंदिया | ३८.९ | २६.८ |
| जळगाव | ३३.८ | २६ |
| कोल्हापूर | २८.८ | २२.५ |
| लातूर | ३१.३ | २४.७ |
| मुंबई | ३२.२ | २६.९ |
| नागपूर | ३९ | २७ |
| नांदेड | ३३.१ | २६.८ |
| नंदूरबार | ३१.९ | २५.१ |
| नाशिक | २९.६ | २३.५ |
| पुणे | २६.४ | २२.३ |
| पंढरपूर | ३३.२ | २४.९ |
| सातारा | २९.१ | २१.९ |
| सांगली | ३१.१ | २३.२ |
| सोलापूर | ३३.४ | २५.४ |
| वर्धा | ३८.६ | २७.५ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम आपल्या पराक्रमीवृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील.

**तुळ :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता.

**वृषभ :** शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा:पश्चिम स्वत:च्या विवेकाने निर्णय घेऊन कामे केल्यास यश मिळू शकेल.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पुर्व मतभेद, वादांना टाळण्याचा प्रयत्न करा. आर्थिक स्थिती चिंताजनक राहिल.

**मिथुन :** शुभ रंग: पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व व्यापारिक जबाबदारी, देणे-घेणे सीमित ठेवा. सुखद प्रवासाचे योग येतील.

**धनु :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. अडचणीवर मात कराल.

**कर्क :** शुभ रंग: हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा.

**मकर :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व पूर्वी केलेल्या चांगल्या कामाचे फळ आता मिळेल. जोडीदाराशी संबंधात प्रगाढता येईल.


**सिंह :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम मुलांकडून थोडा त्रास होईल, परंतू प्रयत्न केल्यास समस्या सुटू शकते.

**कुंभ :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पश्चिम आत्मविश्वास वाढीस लागेल. कामात तसेच व्यवसायात मनासारखे यश मिळेल.

**कन्या :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पुर्व कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**मीन :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल. वाईट सवयीपासून दूर रहा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९९२



### आडवे शब्द

१. फूल नाही तर निदान एवढी तरी!
३. अपशकुन होणे
६. सहाय्य
८. नशीब, काम
९. वरण वाढण्याचे साधन
१०. पातळसर
११. नोकरी
१२. बाजीप्रभूंनी लढवलेली जागा
१४. बासरी
१५. अस्सल
१६. माफी मागणारा
१८. सांब सदाशिव
२०. निखाऱ्यावर भाजलेली पोळी
२१. कबूतर
२३. पाण्याला सुवासिक करणारी मुळे
२४. कावळा
२५. वृद्धी
२६. सुका, वाळलेला
२७. वेतन
२९. शरम
३१. बडबड
३३. मदत करणारा
३५. भाव, किंमत वाढणे
३७. भीमाजवळचे शस्त्र
३८. सरस, नीरस
३९. चप्पल
४१. छोटा, लहान
४३. चांदणी
४४. उलटीपूर्वीची स्थिती, ४६. कष्टप्रद, अवघड
४८. धोकादायक (हिंदी)
५०. तमाशा
५२. घोड्याचे दाणे खाण्याची पिशवी, मोठा घास
५३. एक पाताळ
५५. प्रखर, तिखट, जाळणारे
५७. भरभराट
६०. किंमतीला, वजनाला जड
६१. पालिकेतील लोकप्रतिनिधी
६४. स्तोम
६५. आठवाड्यातील मधला वार
६६. अस्थिर, हालणारे
६८. पुष्परस
६९. चंद्र
७०. सौंदर्य

### उभे शब्द

१. साखरेचा रस
२. कामगार
३. बागवान
४. जे करायला पाहिजे ते न करता दुसरेच करणारा
५. विसराळू
६. रदन
७. समशेर
९. तपासणी करणारा
१०. रस्ता, मार्ग
१२. मूळ आधार
१३. सूड उगवणे (वाक्य प्रचार)
१४. स्वयंपाकाचे शास्त्र
१५. व्यय
१७. संगीतातील एक राग
१९. संशय
२०. ओझे वाहणारे जनावर
२२. उपयोग
२३. उत्तराधिकारी
२५. वितरण
२८. पूर्ण तयारी
३०. लोकांचा कल आणि कौल
३२. प्रफुल्लित
३४. लाकूड कापण्याचे हत्यार
३६. पात्याची तीक्ष्णता
३७. अजागळ
४०. घोटाळा
४२. बगलेमध्ये होणारा फोड
४३. वाट्टेल ते बोलणे
४४. दहावी रास
४५. सहाय्य
४७. भाजी धुण्याची धातूची टोपली
४८. वाईट
४९. रक्षण करणारा
५१. भूतकाळ
५४. समुद्र
५६. -- -- काष्ठी पाषाणी म्हणजे सर्वत्र
५८. साप्ताहिक सुट्टीचा दिवस
५९. शरीर
६०. दूध न देणारी गाय
६२. घड्याळाचा जागविणारा आवाज
६३. सेनापती
६४. तरुण, सुंदर स्त्री
६५. पृथ्वीजवळचा ग्रह
६७. वृक्ष

### जम्बो शब्दकोडे क्र. ९९१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.जनगणमन ६.कासावीस ८.राजवट १०.गाल ११.सवलत १३.नाराज १४.सारा १६.तारकानाथ १८.वाटचाल २०.भागाकार २२.वेत २३.खडा २४.साखर २६.सरळ २८.नकार ३०.चुका ३१.ललत ३३.पथक ३४.नखरा ३६.देवालय ३८.डीर ४०.ढ ४१.सत्ताधीश ४३.माननीय ४५.बरकत ४८.पर ४९.जनक ५१.रण ५२.बक ५३.तेढ ५५.थोर ५७.लेह ५८.गायक ५९.शेगाव ६१.स्पर्धक ६२.भाव ६३.सडा ६५.वळणदार ६७.लवकर ६९.कावळा ७०.वर ७१.पुणेकर ७२.गोरापान ७४.तोरा ७५.पापा ७६.फार ७७.पुणेरी ७९.तमा ८१.जवळजवळ ८३.ढोल ८४.समानता ८५.रान ८६.जाणे

उभे उत्तर : १.नगारा ३.गल ४.मस ५.नव ६.कातरवेळ ७.सनाथ ८.राजवाडा ९.टक्कल १२.लता १४.सालोसाल १५.सोगा १७.कात १९.चाराचुरा २०.भारत २१.रस २३.खर २५.खलबत्ता २७.रसायन २८.नथ २९.काकडी ३२.हेवा ३३.पलायन ३५.खडक ३६.देश ३७.लमाण ३९.रबर ४१.सरतेशेवटी ४२.धीर ४४.नीज ४६.रणगाडा ४७.तबक ४८.परस्पर ५०.कलेवर ५४.ढगाळ ५६.हाकलणे ६०.वणवणणे ६२.भाकर ६३.सहारा ६४.बोळा फिरवणे ६६.दार ६८.वकटे ६९.कान ७१.पुरातन ७२.गोपाळ ७३.पालव ७५.पावन ७७.फुल ७८.रीस ८०.माता ८१.जरा ८२.जप


RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## महामार्गांवरील प्रवास आता अधिक सुरक्षित! ‘एमएसआरडीसी’ने उचलले मोठे पाऊल

पुणे (दैनिक संध्या) : राज्यातील महामार्ग आणि त्याभोवतीच्या सरकारी जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत. अवैध इमारती आणि अनधिकृत जाहिरात फलकांमध्ये मोठी वाढ झाल्याने अनेक ठिकाणी वाहतुकीस धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) राज्यभरात प्रमुख महामार्ग आणि त्याभोवतीच्या जागांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वेक्षणाद्वारे अतिक्रमणे शोधून ती हटविण्यात येणार असून, यामुळे वाहनचालकांचा महामार्गांवरील प्रवास अधिक सुरक्षित होणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे प्रमुख महामार्गांबरोबरच त्यांच्या बाजूची गावे सोपविण्यात आली आहेत. त्यामुळे महामार्ग आणि त्याभोवतालच्या जागेतील बांधकामे आणि जाहिरात फलकांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यात अनधिकृत, विनापरवाना बांधकामे शोधण्यात येणार आहेत. तसेच, वैध बांधकामे परवानगीनुसार उभारण्यात आली आहेत का, याचीही तपासणी केली जाणार आहे. याचबरोबर महामार्गांभोवतालच्या जाहिरात फलकांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यात अनधिकृत फलक शोधण्यात येणार आहेत. तसेच, वाहतुकीसह पादचाऱ्यांना अडथळा ठरणाऱ्या जाहिरात फलकांची नोंद विशेषत्वाने केली जाणार आहे. महामार्गांभोवतीची बांधकामे आणि जाहिरात फलकांचा ‘जीआयएस’ आधारित विदासंच तयार केला जाणार आहे. त्यातून भविष्यात ही बांधकामे आणि जाहिरात फलकांवर देखरेख ठेवणे शक्य होणार आहे.



## नसरापूर प्रकरणात आरोपी भीमराव कांबळे दोषी; न्यायालय काय शिक्षा ठोठावणार?

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र दिनी भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करुन खून केल्याप्रकरणी न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळेला (६५) दोषी ठरवले आहे. विशेष न्यायालयात बंद दाराआड (इन कॅमेरा) या संवेदनशील प्रकरणाची सुनावणी झाली. कांबळेला २९ जून रोजी शिक्षा सुनावली जाणार असून, न्यायालय आता कांबळेला काय शिक्षा ठोठावणार? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. राज्यातील न्यायालयीन इतिहासात जलदगतीने सुनावणी झालेला नसरापूर अत्याचार प्रकरण हा पहिला खटला ठरणार आहे. “आरोपीला जन्मठेप न देता मृत्यूदंड म्हणजेच फाशीची शिक्षा का दिली जावी? याबाबत न्यायालयात युक्तिवाद झाला. मुलीचे घटनेवेळी वय तीन वर्ष, दोन महिने आणि सात दिवस, मुलीवर एकूण ३९ मिनिट शोषण केले असून, तिच्या देहावर १८ जखमा आढळून आल्या आहेत. मुलीचा विनयभंग करुन बलात्कार केल्याचा न्यायालयात आम्ही सिद्ध करु शकलो”, अशी माहिती सरकारी वकील आणि पोलिसांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषेद दिली. “आरोपीने पीडितेच्या मृतदेहाशी देखील अनैसर्गिक संबंध केल्याचे देखील आम्ही सिद्ध केले आहे. त्यामुळे अशा विकृत माणसाला जगण्याचा अधिकार नाही”, असा युक्तिवाद केल्याचे सरकारी वकील म्हणाले. विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी पीडित बालिकेचे आई-वडील, आजी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पंच, तपास अधिकारी, न्यायवैद्यकीय तज्ज्ञ, डीएनए विश्लेषक यांच्यासह ५५ जणांची साक्ष नोंदविली. २५ तारखेपासून आरोपी पीडितेची रेकी करत होता. वैद्यकीय अहवालातून तिच्यावर अत्याचार केल्याचे सिद्ध आले आहे. अशा व्यक्तिला जगण्याचा अधिकार आहे का? पीडितेच्या मृत्यूनंतर देखील मृत शरीरावर आरोपीने अत्याचार केले, असा युक्तिवाद न्यायालयात केल्याची माहिती सरकारी वकिलांनी दिली.

## दिवसाआड पाणीपुरवठ्याच्या तक्रारी! पुणे महापालिकेने आकडेवारीच केली जाहीर



पुणे (दैनिक संध्या) : महापालिकेने दिवसाआड पाणी देण्यास सुरुवात केल्यानंतर पाणी पुरवठ्याबाबत तक्रारी महापालिकेकडे येण्यास सुरुवात झाली आहे. आतापर्यंत १२०० पेक्षा अधिक तक्रारी प्रशासनाकडे आल्या असून, यातील ४५० तक्रारी सोडविल्याचा दावा महापालिकेने केला आहे. अद्यापही ७५० तक्रारी सोडविणे बाकी असून, या सोडविण्याचा प्रयत्न असल्याचे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीतील पाणीसाठा कमी झाल्यानंतर महापालिका प्रशासनाने शहरात दिवसाआड पाणी देण्यास सुरुवात केली आहे. हवामान खात्याने यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. त्याचबरोबर एल-निनोच्या प्रभावामुळेदेखील पावसावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. खडकवासला धरण साखळीत ३.८१ टीएमसी पाणी शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने पाणीवापरावर निर्बंध घालून २५ टक्के पाणीबचत करण्याचा निर्णय घेतला आहे. शहराच्या विविध भागांत सम व विषम तारखेनुसार एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यास १५ जूनपासून महापालिकेने सुरुवात केली आहे. त्याचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही सम विषम तारखांच्या पाणीपुरवठ्याबाबत तक्रारी येण्यास सुरुवात झाली आहे.

## पुणे शहरात पाणीपुरवठा अ‘समान’च! इतक्या झोनचे काम अपूर्णच....

पुणे (दैनिक संध्या) : शहरातील नागरिकांना सुरळीत आणि पुरेशा दाबाने पाणी मिळावे, यासाठी सुरू करण्यात आलेल्या योजनेचे काम अद्याप अपूर्णच असल्याचे समोर आले आहे. शहरात असलेल्या १४१ पैकी केवळ ४८ झोनचे काम पूर्ण करण्यामध्ये प्रशासनाला यश मिळाले आहे. विशेष म्हणजे ज्या भागांमध्ये योजना पूर्ण झाल्याचा दावा केला जात आहे, त्या भागांमध्येही अद्याप समान पाणी मिळत नसल्याचे चित्र आहे. शहरातील प्रत्येक भागांतील नागरिकांना एकसमान पाणी मिळावे, यासाठी महापालिकेने समान पाणीपुरवठा योजना आणली. यासाठी पहिल्या तीन वर्षांत मिळकतकराच्या पाणीपट्टीत दर वर्षी १५ टक्के, तर त्यानंतर २०४८ पर्यंत प्रत्येक वर्षी पाच टक्के वाढ करण्याचा ठराव महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. त्यानुसार महापालिकेने त्याची अंमलबजावणी सुरू करून नागरिकांकडून शुल्क वसूल करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, ही योजना अद्याप कार्यान्वित करण्यास महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला यश आलेले नाही. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्च करून राबविण्यात येत असलेली ही योजना प्रत्यक्षात पुणेकरांच्या अपेक्षा पूर्ण करणार का, असा प्रश्न विचारला जात आहे.

## डायनॅमिक भारत २०४७ : श्री. निलेश ओक यांचे व्याख्यान २८ जून रोजी




पुणे (दै. संध्या)

भारताच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास आणि त्यातून भविष्यातील भारताची दिशा याविषयी मार्गदर्शन करणारे “डायनॅमिक भारत २०४७” हे विशेष व्याख्यान रविवारी, २८ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता कर्वेनगर येथील पंडित फार्म्स, डी.पी. रोड येथे आयोजित करण्यात आले आहे. नागरिक सोशल फाउंडेशन आणि ॲम्बिशन्स कॉमर्स इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात प्राचीन इतिहासाचे अभ्यासक व संशोधक निलेश ओक मार्गदर्शन करणार आहेत. रामायण आणि महाभारत ही केवळ महाकाव्ये किंवा काल्पनिक कथा नसून ती भारतीय इतिहासाच्या प्रदीर्घ परंपरेचा भाग असल्याचा दृष्टिकोन मांडत, इतिहासाचे चिंतन वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी कसे उपयुक्त ठरू शकते यावर ते भाष्य करणार आहेत.

भारताच्या हजारो वर्षांच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाच्या आधारावर २०४७ पर्यंत देशाला अधिक वैभवशाली बनविण्याच्या संकल्पनेवर या व्याख्यानात चर्चा होणार आहे. तसेच इतिहासातील विविध संदर्भांमधील विज्ञान, ज्ञानपरंपरा आणि तत्कालीन तांत्रिक प्रगती याविषयीही माहिती दिली जाणार आहे.

विशेषतः युवकांनी आपल्या इतिहासाकडे आत्मविश्वासाने पाहून राष्ट्रनिर्मितीत सक्रिय योगदान द्यावे, हा या कार्यक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# चाकण-हडपसरमध्येही काढता येणार पासपोर्ट




### नागरिकांना आवाहन

- अर्जासाठी मध्यस्थांकडे जाण्याची गरज नाही
- पारपत्रासाठी सरकारी ॲप आणि संकेतस्थळाचाच वापर करावा
- सामान्य श्रेणीत अर्ज करताना किमान सहा महिन्यांपूर्वी अर्ज करावा
- सगळ्या कागदपत्रांची पडताळणी करावी
- अपॉइंटमेंटची तारीख चुकवू नका

पुणे (दै. संध्या)

पारपत्रांसाठीचे वाढते अर्ज आणि एकाच केंद्रावरील ताण कमी करण्यासाठी चाकण, हडपसर परिसरात आता नवीन पोस्ट ऑफिस पारपत्र सेवा केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

सध्या पिंपरी-चिंचवड येथे पोस्ट ऑफिस पारपत्र सेवा केंद्र सुरू असून, पुण्यात आणखी दोन ते तीन केंद्रे सुरू करण्यासाठी प्रयत्नशील असल्याची माहिती प्रादेशिक पारपत्र अधिकारी डॉ. विनोद गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. उप-प्रादेशिक पारपत्र अधिकारी श्रुती पांडे यावेळी उपस्थित होत्या.

गायकवाड म्हणाले, ‘सध्या पारपत्र काढण्यासाठीचा प्रतीक्षा कालावधी सामान्य श्रेणीसाठी २६ दिवस, तर तत्काळसाठी २ दिवसांपर्यंतचा आहे. पुणे आणि परिसरात पारपत्रासाठीच्या अर्जांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तसेच, इतर अनेक कारणांमुळे पारपत्र सेवा केंद्रातील व्यवस्थेवरही ताण येतो. हा ताण कमी करण्यासाठी, नागरिकांना लवकरात लवकर पारपत्र काढता यावे म्हणून फिरते पारपत्र केंद्र, पारपत्र मेळावे घेण्यात येतात. आता चाकण औद्योगिक पट्ट्यातील आणि पूर्व पुण्यातील वेगाने विकसित होत असलेल्या हडपसर परिसरात नवीन दोन ते तीन पोस्ट ऑफिस पारपत्र सेवा केंद्रे सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना लांबचा प्रवास करून बाणेर येथे पारपत्र सेवा केंद्रात यावे लागणार नाही. तसेच गर्दी विभागल्याने पारपत्रासाठीचा प्रतिक्षा कालावधीही कमी होण्यास मदत होईल.’ ‘क्षेत्रीय पारपत्र कार्यालयाकडून पारपत्रांसाठी विशेष मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते. त्यात एका दिवसात सुमारे १ हजार ५०० अर्ज स्वीकारण्यात येतात. तर, वेगवेगळ्या भागांत मागणीनुसार ठरावीक कालावधीत फिरते पारपत्र सेवा केंद्रही सुरू करण्यात येते. पारपत्र काढण्याची संपूर्ण प्रक्रिया सुलभ व्हावी म्हणून विभागाकडून पोलीस, पोस्टाच्या कर्मचाऱ्यांनाही प्रशिक्षण देण्यात येत आहे,’ अशी माहितीही त्यांनी दिली.


क्षेत्रीय पारपत्र कार्यालयाकडून जानेवारी ते मे महिन्यादरम्यान पुणे विभागात २ लाख १७ हजार ४३९ पारपत्र देण्यात आली आहेत. या कालावधीत २ लाख २२ हजार १६९ नागरिकांनी अर्ज केले होते. विभागात गेल्या वर्षी ४ लाख ७२ हजार ९६६ पारपत्र देण्यात आले, तर ५ लाख ८ हजार ५२८ नागरिकांनी पारपत्रासाठी अर्ज केले होते, अशी माहिती विभागीय पारपत्र अधिकारी डॉ. विनोद गायकवाड यांनी दिली. अपुरी कागदपत्रे, अपॉइंटमेंट घेऊनही न आलेले अर्जदार आणि पोलीस पडताळणीत काही अर्ज नाकारण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

## धर्मवीर संभाजी महाराज जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन

धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती, पुणे आणि जनहित चॅरिटेबल ट्रस्ट : सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचा भव्य संगम

पुणे (दै. संध्या)

**■ आरोग्य शिबिर, रक्तदान, ११ हजार वडापाव वाटप, गोसेवा, शैक्षणिक मदत आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन**




धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती, पुणे आणि जनहित चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार, दिनांक २६ जून २०२६ रोजी सदाशिव पेठेतील भरत नाट्य मंदिर परिसर येथे सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचा भव्य संगम होणार आहे.

धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती पुणे चे अध्यक्ष पियुष विजय कुमार शहा, उपाध्यक्ष निलेश खाणेकर जनहित चॅरिटेबल ट्रस्ट संस्थापक अध्यक्ष प्रकाश ढमढेरे, उत्सव प्रमुख रोहन जाधव यांनी उपक्रमाचे आयोजन केले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराजांच्या विविध छटा उलगडणाऱ्या रंगावली प्रदर्शनाने होणार आहे. याचबरोबर महिला स्वच्छतादूत भगिनींसाठी ब्रेस्ट कॅन्सर शिबिर, ज्येष्ठ नागरिकांसाठी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, तसेच ईसीजी, सीबीसी, मधुमेह, रक्तदाब, दंत तपासणी आदी विविध तपासण्यांसह आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्ताचा प्रत्येक थेंब अमूल्य असल्याचा संदेश देत भव्य रक्तदान शिबिरही आयोजित करण्यात आले आहे.

दुपारी १२.३० वाजता गोशाळांना गोधनाच्या खाद्यस्वरूपात मदत करण्यात येणार असून, दुपारी ४ वाजता अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच ग्रामीण व आदिवासी-कातकरी विद्यार्थ्यांना शालेय क्रीडा साहित्याचे वितरणही करण्यात येणार आहे.

संभाजी महाराज जयंतीनिमित्त ११ हजार वडापाव वाटपाचा उपक्रमही राबविण्यात येणार असून, या उपक्रमाची लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होणार आहे. सकाळी ९.१५ वाजता या उपक्रमास प्रारंभ होणार आहे.

सायंकाळी ५ ते ८ या वेळेत 'विश्व आख्यान' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, इतिहास, कला आणि संस्कृतीचा संगम घडविणाऱ्या या कार्यक्रमातून छत्रपती संभाजी महाराजांचे कार्य आणि विचार मांडले जाणार आहेत.


## शासकीय ‘आयटीआय’मध्ये आता खासगी कंपन्यांची कोट्यवधींची गुंतवणूक

पुणे (दै. संध्या)

राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सार्वजनिक खासगी भागीदारीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्या अंतर्गत खासगी भागीदारांना १० वर्षांसाठी किमान १० कोटी रुपये, तर २० वर्षांसाठी किमान २० कोटी रुपये गुंतवणूक अनिवार्य असणार आहे. ६० टक्के भांडवली गुंतवणूक आणि ४० टक्के परिचालन गुंतवणूक असे गुंतवणुकीचे स्वरूप ठरवण्यात आले असून, कंपन्यांना गुंतवणुकीसाठी दिलेल्या मुदतीत गुंतवणूक करणे आवश्यक असणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाने या बाबतचा शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध केला. सार्वजनिक खासगी भागीदारीअंतर्गत औद्योगिक संस्था आणि बिगर-सरकारी संस्थांमध्ये सामंजस्य करार केला जाणार आहे. या कराराचा अधिकृत इंग्रजी मसुदा तयार करण्यात आला आहे. सामंजस्य कराराद्वारे उद्योग कंपन्यांना निश्चित कालमर्यादेमध्ये आयटीआयमध्ये पायाभूत सुविधा निर्मिती, गुंतवणूक करावी जाणार आहे. आयटीआयची मालकी राज्य शासनाचीच राहणार आहे. आयटीआयमधील सुविधा अद्ययावत करणे, अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण सुविधा जागतिक दर्जाच्या करणे, कृत्रिम बुद्धिमत्ता, विद्युत वाहने, रोबोटिक्स, हरित हायड्रोजन अशा उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील अभ्यासक्रम तयार करणे, विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रमशीलता, उद्योजकता वाढीस लावणे, अप्रेन्टिसशिप, दुहेरी प्रमाणपत्राच्या प्लेसमेंट वाढवणे हे सार्वजनिक खासगी भागीदारीचे प्रमुख ध्येय असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## भरधाव टँकरचा आणखी एक बळी! चाकाखाली सापडून व्यावसायिकाचा मृत्यू

पुणे (दै. संध्या)




भरधाव टँकरच्या धडकेत दुचाकीस्वार व्यावसायिकाचा मृत्यू झाल्याची घटना वाघोली परिसरात घडली. या प्रकरणी टँकर चालकाविरुद्ध वाघोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला. बाबूलाल रामाजी चौधरी (वय ४८, रा. आई माता निवास, गोकुळ पार्क, लोणीकंद, अहिल्यानगर रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. या प्रकरणी टँकर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत चौधरी यांचे नातेवाईक मुकेश समाराम चौधरी (वय ३७, रा. पासलकर लॉनशेजारी, वाडेबोल्हाई रस्ता, लोणीकंद) यांनी वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार बाबुलाल चौधरी हे मंगळवारी (२४ जून) दुपारी साडेचारच्या सुमारास केसनंद-वाघोली रस्त्याने निघाले होते. त्या वेळी पाणी वाहतूक करणाऱ्या टँकरने दुचाकीला धडक दिली. दुचाकीच्या चाकाखाली सापडून चौधरी गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक हवाले तपास करत आहेत.

# स्मार्ट सिटीचे ‘गाजर’ दाखवून पुणेकरांची केली फसवणूक

### भाजप नेत्यांनी माफी मागावी : माजी आमदार मोहन जोशी

पुणे (दै. संध्या)

'स्मार्ट सिटी' योजनेद्वारे पुण्याला जागतिक दर्जाचे शहर बनवू, असे आश्वासन केंद्रातील मोदी सरकारने दिले आणि प्रत्यक्षात मात्र, ती योजना गुंडाळून पुणेकरांची फसवणूक केली, याबद्दल भाजपच्या नेत्यांनी पुणेकरांची माफी मागायला हवी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष, माजी आमदार मोहन जोशी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

स्मार्ट सिटी योजनेचा प्रारंभ पंतप्रधान मोदी यांनी मोठा गाजावाजा करून केला. या निमित्ताने बालेवाडी येथे एक इव्हेंटच साजरा केला. काँग्रेस आघाडी सरकारचे पंतप्रधान मनमोहनसिंग सरकारने शहरांच्या सुधारणांसाठी जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण योजना (जेएनयूआरएम) ही चांगली चाललेली योजना सरकारने बंद केली आणि स्मार्ट सिटी योजना ही योजना आणली. ही योजना तकलादू आहे, हे पहिल्या दोन, तीन वर्षातच उघड झाले होते. बाणेर-बालेवाडी हा भाग पहिला टप्पा म्हणून जाहीर केला. पण हा टप्पा कधीच पूर्ण झाला नाही. या योजनेत पुण्याची निवड झाली तेव्हा भाजपच्या नेत्यांनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला होता. आता ती योजना मोदी सरकारनेच गुंडाळली गेली आहे आणि भाजपचे नेते मंडळी मूग गिळून गप्प बसली आहेत, पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री, राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री, एक राज्यसभा सदस्य, एक उच्च शिक्षण मंत्री आणि भाजपचे पाच आमदार आहेत. या सगळ्यांनी एकत्रितपणे स्मार्ट सिटी योजना गुंडाळल्याबद्दल पुणेकरांची जाहीर माफी मागायला हवी, असे मोहन जोशी यांनी पत्रकात म्हटले आहे.

केंद्र आणि राज्य सरकारने पुणे स्मार्ट सिटी डेव्लपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी अधिकृतपणे बंद केली आहे. योजना सुरू करताना पंतप्रधान मोदींनी गाजावाजा केला आणि बंद करताना गुपचूपपणे केली, यातून मोदी सरकारची फसवेगिरीची वृत्ती दिसून येते. गेल्या ११ वर्षात स्मार्ट सिटी योजनेद्वारे ९८० कोटी रुपये खर्च केले. मात्र, यातून पुणेकरांना मुलभूत सुविधा मिळालेल्याच नाहीत, त्यामुळे भाजप नेत्यांनी या कोट्यवधी रुफयांच्या खर्चाचा तपशील द्यायला हवा, अशी मागणी मोहन जोशी यांनी केली आहे.

स्मार्ट सिटी, मुठा, मुळा नदी सुधार योजना, सांडपाण्याचा फेरवापर करण्यासाठी 'जायका' प्रकल्प, या योजनांमध्ये उदघाटने करणे, गाजावाजा करणे या व्यतिरिक्त मोदी सरकारने काहीही केलेले नाही, फक्त जुमलेबाजी केली आहे, अशी टीका मोहन जोशी यांनी पत्रकात केली आहे.

# हर्षदुहिता कलेक्टिव्ह : भारतीय संगीत परंपरेला नव्या युगाचा स्वर

पुणे (दै. संध्या)




भारतीय शास्त्रीय संगीताची समृद्ध परंपरा आणि आधुनिक संगीत अभिव्यक्ती यांचा सुरेल संगम घडवत हर्षदुहिता कलेक्टिव्ह आज देशभरातील संगीतप्रेमींच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. भजन, सुफी संगीत, लोकधुना, गझल आणि आधुनिक संगीत रचना यांचे अनोखे मिश्रण सादर करणाऱ्या या समूहाने भारतीय संगीतविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

रामपूर आणि जयपूर घराण्यांच्या समृद्ध वारशातून प्रेरणा घेतलेल्या हर्षदुहिता कलेक्टिव्हचा संगीतप्रवास केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून तो संस्कृती, परंपरा आणि आत्म-अभिव्यक्तीचा प्रवास आहे. भारतीय शास्त्रीय संगीताच्या भक्कम पायावर उभा असलेला हा समूह आधुनिक काळातील श्रोत्यांशी संवाद साधत परंपरा आणि समकालीनतेत एक सुंदर पूल उभारतो.

विशेष म्हणजे, आज ज्या फ्यूजन शैलीसाठी हर्षदुहिता कलेक्टिव्ह प्रसिद्ध आहे, ती कोणतीही आखणी करून तयार झालेली नाही. “वेगवेगळ्या शैली मिसळून फ्यूजन तयार करण्याचा आमचा कधीच हेतू नव्हता. आमच्या अनुभवांचा, परंपरांचा आणि संगीतप्रवासाचा तो नैसर्गिक परिणाम आहे,” असे समूहाचे सदस्य सांगतात.

त्यांच्या सादरीकरणात पारंपरिक भजनांची भक्ती, सुफी संगीताची आध्यात्मिकता, लोकसंगीताची मातीशी नाळ आणि आधुनिक संगीताची ताजगी यांचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळतो. त्यामुळे त्यांचे प्रत्येक सादरीकरण हे श्रोत्यांसाठी एक भावनिक आणि संस्मरणीय अनुभव ठरते.

हर्षदुहिता कलेक्टिव्हच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे लोकप्रिय दूरचित्रवाणी कार्यक्रम **‘इंडियाज गॉट टॅलेंट’**मध्ये उपांत्य फेरीपर्यंत मजल मारणे. या व्यासपीठामुळे त्यांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आणि त्यांचे संगीत देशभरातील लाखो श्रोत्यांपर्यंत पोहोचले.

समूहाला त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कारासारख्या प्रतिष्ठित सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. मात्र, त्यांच्या मते सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे श्रोत्यांच्या मनात निर्माण होणारे भावनिक नाते.

“जेव्हा एखादा श्रोता सांगतो की आमच्या संगीतामुळे त्याला दिलासा मिळाला, घराची आठवण झाली किंवा एखादी सुंदर आठवण पुन्हा जागी झाली, तेव्हा तोच आमच्यासाठी सर्वात मोठा सन्मान असतो,” असे ते सांगतात.

हर्षदुहिता कलेक्टिव्हचा ठाम विश्वास आहे की परंपरा केवळ जपण्याची गोष्ट नसून ती अनुभवली, जगली आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवली पाहिजे. याच ध्येयाने प्रेरित होऊन हा समूह भारतीय संगीत वारशाला आधुनिक काळातील नवा आवाज देत आहे.

वाढता श्रोता वर्ग, राष्ट्रीय स्तरावरील लोकप्रियता आणि कलात्मक प्रामाणिकतेची जपणूक यामुळे हर्षदुहिता कलेक्टिव्ह भारतीय संगीत क्षेत्रातील एक प्रेरणादायी नाव ठरत आहे. वेगाने बदलणाऱ्या जगातही परंपरेचा आत्मा जपत वर्तमानाशी संवाद साधणारे त्यांचे संगीत आजच्या पिढीसाठी आशेचा आणि संस्कृतीशी जोडणारा सुरेल धागा ठरत आहे.

भारतीय संगीताचा वारसा जपत नव्या पिढीशी नाते जोडणारा हर्षदुहिता कलेक्टिव्ह आज संगीतविश्वात नव्या युगाचा स्वर बनला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नवी कोरी मिनी कंट्रीमॅन सी भारतात सादर

चेन्नई (दैनिक संध्या) : आधुनिक पिढीची कंट्रीमॅन आता "मेड इन इंडिया" म्हणजेच भारतात निर्मिली जाणारी आणि स्थानिक पद्धतीने याचा पेट्रोल वेरियंटची निर्मीती ही बीएमडब्लू ग्रुपच्या भारतात नव्या मिनी कंट्रीमॅन सी चे सादरीकरण करण्यात आले आहे. या गाडीचे उत्पादन चेन्नई येथील प्लान्टमध्ये केले जाणार आहे. कारची बुकिंग ही सगळ्या मिनी इंडियाच्या आधिकृत डिलर्सकडे करता येईल आणि त्याचा डिलिवरीज देखील अगदी लगेच सुरू करण्यात येतील. या कारमध्ये आत्याधुनिक मिनी ट्वीनपॉवर टर्बो तंत्रज्ञान तसेच दमदार गो-कार्ट फीलचा ट्रेडमार्क आणि पेट्रोल इंजिन चालविण्याचा एक विशेष अनुभव मिळणार आहे. तीन वर्षांनंतर देखील ६६% पर्यंतची या श्रेणीतील सर्वोत्तम बायबॅक किंमत ची हमी कंपनीकडून दिली जाणार आहे. स्टयालिश अशा "फेवर्ड पॅक" मध्ये उपलब्ध, नव्या कोऱ्या मिनी कंट्रीमॅन सी ची एक्स-शोरूम किंमत ही भारतीय चलनात ४७,५०,००० एवढी असेल. श्री. हरदीप सिंग ब्रार, बीएमडब्लू ग्रुप इंडियाचे अध्यक्ष आणि सीईओ यावेळी बोलताना म्हणाले, " नवी कोरी मिनी कंट्रीमॅन सी ही आपल्या काळातील एक बिग (भव्य) असा अनुभव देणारी गाडी आहे. ही गाडी पारंपारिक मिनी ला सुंदर पद्धतीने एका दमदार अशा एसयुव्ही मध्ये रूपांतरीत करते, या गाडीला एक बोल्ड लुक असून याची निर्मीती ही साहसी कौटुंबिक सहलींकरीता केली गेली आहे, पण त्याच बरोबर प्रतिष्ठित असा गो-कार्ट फिलिंगचा अनुभव देखील ग्राहकांना घेता येणार आहे. आम्हाला अभिमान आहे की गाडीची निर्मीती भारतात होणार असून, यामुळे आमचा उत्पादनांचा पोर्टफोलियोला धोरणात्मक बळकटी मिळेल आणि ग्राहकांना ती उत्तम किंमतीत उपलब्ध करून देता येऊ शकेल."

### संविधान रक्षणाच्या लढाईत अनुसूचित जाती समाजाची भूमिका महत्त्वाची : सपकाळ



मुंबई (दैनिक संध्या) : देशात सध्या मनुवादी आणि संविधानवादी विचारसरणी यांच्यात संघर्ष सुरू असून संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी अनुसूचित जाती समाजाने निर्णायक भूमिका बजावली पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. मुंबईतील टिळक भवन येथे महाराष्ट्र काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे नवनियुक्त चेअरमन अनिरुद्ध वनकर यांच्या पदग्रहण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष गणेश पाटील, सरचिटणीस संदेश कोंडविलकर, माजी चेअरमन सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांच्यासह शेकडो पदाधिकारी उपस्थित होते. सपकाळ म्हणाले की, मागील १२ वर्षांत देशातील लोकशाही मूल्ये आणि संविधानिक संस्थांवर सातत्याने आघात झाले आहेत. संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी व्यापक संघर्ष उभारण्याची गरज असून या लढाईत अनुसूचित जाती समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. देशासमोरील आव्हाने लक्षात घेऊन कार्यकर्त्यांनी संघर्षासाठी सज्ज राहावे, असे आवाहनही त्यांनी केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका करताना सपकाळ यांनी संघाच्या कार्यपद्धती आणि आर्थिक व्यवहारांबाबत प्रश्न उपस्थित केले. समाजात तेढ निर्माण करणाऱ्या शक्तींविरोधात संविधानवादी विचारांनी एकत्रितपणे लढा देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना अनिरुद्ध वनकर यांनी भारतीय जनता पक्षावर संविधानविरोधी भूमिका घेतल्याचा आरोप केला. लोकसभा निवडणुकीत संविधान रक्षणाचा मुद्दा प्रभावीपणे मांडल्यामुळे भाजपाचा डाव उधळला गेला, असा दावा त्यांनी केला. संविधानाला असलेला धोका अद्याप कायम असून दलित व अल्पसंख्याक समाजाच्या हक्कांवर परिणाम करणाऱ्या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात माजी चेअरमन सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांनीही मार्गदर्शन केले. नव्या जबाबदारीसाठी अनिरुद्ध वनकर यांना शुभेच्छा देत काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाच्या संघटनात्मक बळकटीकरणावर भर देण्याचे आवाहन करण्यात आले.

### कलर्स मराठीचा 'वटपौर्णिमा विशेष महासंगम' प्रेक्षकांच्या भेटीला

पुणे (दैनिक संध्या) : कलर्स मराठीवरील लोकप्रिय मालिका 'मी जिंकून घेईन सारं' आणि 'मोहिनी – प्रेमाची फिल्मी कहाणी' यांचा बहुप्रतीक्षित 'वटपौर्णिमा विशेष महासंगम' प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची अनोखी पर्वणी घेऊन येत आहे. २९ जून ते १ जुलै दरम्यान सलग तीन दिवस संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणाऱ्या या विशेष भागांमध्ये सणाचा उत्साह, कौटुंबिक नात्यांचे भावविश्व, रहस्य, थरार आणि नाट्यमय घडामोडींचा संगम पाहायला मिळणार आहे. वटपौर्णिमेच्या पवित्र सणाच्या पार्श्वभूमीवर उलगडणाऱ्या या कथानकात केवळ पारंपरिक वटपूजनच नव्हे, तर सुड, कारस्थानं आणि अनपेक्षित संकटांचे सावटही प्रेक्षकांना खिळवून ठेवणार आहे. 'कलर्स मराठीची आजची सावित्री' ही संकल्पना अधोरेखित करत, संकटांशी दोन हात करणाऱ्या आणि आपल्या कुटुंबासाठी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या स्त्रियांची प्रेरणादायी कथा या महासंगमातून उलगडणार आहे.

# नर्सिंग सेवेला हिमालया बेबीकेअरचा सलाम

## १५ राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार विजेत्या आणि ५० हजार नर्सेसचा सन्मान

देशाच्या आरोग्य व्यवस्थेचा भक्कम आधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या नर्सेसच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी हिमालया बेबीकेअरने एक विशेष राष्ट्रीय उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत राष्ट्रपती भवनात सन्मानित झालेल्या राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार २०२६ च्या १५ विजेत्या नर्सेसचा गौरव करण्यात आला. तसेच देशभरातील जवळपास ५० हजार नर्सेसचा सन्मान करून त्यांच्या निःस्वार्थ सेवेला मानवंदना देण्यात आली.



नवी दिल्ली (दै. संध्या) :

भारताच्या सर्वाधिक विश्वासार्ह बेबीकेअर ब्रँडपैकी एक असलेल्या हिमालया बेबीकेअरला 'ट्रेन्ड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया' कडून राष्ट्रपती भवनात आयोजित राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार सोहळ्यात सहभागी होण्यासाठी विशेष निमंत्रण देण्यात आले होते. या प्रतिष्ठित पुरस्कारांचे वितरण भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी हिमालया बेबीकेअरने पुरस्कारप्राप्त नर्सेसचा विशेष सत्कार करून त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेतली. रुग्णसेवा, मातृत्व काळजी आणि नवजात बालकांच्या आरोग्य संवर्धनात नर्सेसची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अनेकदा पडद्यामागे राहून अथक परिश्रम करणाऱ्या या आरोग्यसेविकांचे योगदान समाजासमोर आणण्याचा प्रयत्न हिमालया बेबीकेअरने या उपक्रमातून केला आहे.

देशभरातील विविध रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये आणि आरोग्य संस्थांमध्ये १० ते २५ वर्षे सेवा बजावणाऱ्या नर्सेसचा यामध्ये विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या समर्पणाची कदर म्हणून कौतुक समारंभ, सन्मानपत्र वितरण आणि विशेष भेटवस्तू देण्यात आल्या. या माध्यमातून नर्सेसच्या निःस्वार्थ सेवेला कृतज्ञतेची सलामी देण्यात आली.

हिमालया बेबीकेअरने देशभरातील जवळपास ५०,००० नर्सेसपर्यंत पोहोचत त्यांच्या कार्याचा गौरव केला. रुग्णांच्या वेदना समजून घेणे, कठीण परिस्थितीतही धैर्याने सेवा देणे आणि प्रत्येक रुग्णाला मानसिक आधार देणे या नर्सेसच्या गुणांचे कौतुक करण्यात आले.

विशेषतः माता आणि नवजात बालकांच्या आरोग्य रक्षणात नर्सेसचे योगदान अमूल्य आहे. गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंत आणि त्यानंतरच्या काळात माता व बाळाच्या आरोग्याची जबाबदारी सांभाळताना नर्सेस अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे या उपक्रमाला आरोग्य क्षेत्रातूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमाबाबत बोलताना हिमालया वेलनेस कंपनीच्या बेबीकेअर विभागाचे संचालक चक्रवर्ती एन. व्ही. यांनी नर्सेसच्या भूमिकेचे विशेष कौतुक केले.

ते म्हणाले, "नर्सेस आपल्या आरोग्य व्यवस्थेचा कणा आहेत. त्या प्रत्येक वयोगटातील रुग्णांची काळजी घेतात, त्यांना आधार देतात आणि कठीण प्रसंगी दिलासा देतात. माता आणि नवजात बालकांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या क्षणांमध्ये नर्सेसची भूमिका अत्यंत मोलाची असते. त्यांच्या सहानुभूतीपूर्ण सेवेला, कणखरपणाला आणि अविचल समर्पणाला सलाम करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे."

हिमालया बेबीकेअरचा हा उपक्रम केवळ सन्मानापुरता मर्यादित नसून आरोग्य क्षेत्रातील कर्मचाऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक व्यापक प्रयत्न मानला जात आहे. आरोग्य सेवकांच्या योगदानाचा गौरव करून समाजात त्यांच्याविषयी आदर आणि जागरूकता निर्माण करणे हा देखील या मोहिमेचा महत्त्वाचा उद्देश आहे.

आरोग्य क्षेत्रातील आव्हाने दिवसेंदिवस वाढत असताना नर्सेसची भूमिका अधिक महत्त्वाची ठरत आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या सेवाभावाचा गौरव करणारे उपक्रम इतर संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरू शकतात. हिमालया बेबीकेअरने नर्सिंग क्षेत्रातील या अदृश्य नायकांचा सन्मान करून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. देशभरातील लाखो कुटुंबांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत असलेल्या नर्सेसच्या योगदानाला मानाचा मुजरा देणारा हा उपक्रम आरोग्य क्षेत्रातील सेवाभाव, करुणा आणि समर्पणाच्या मूल्यांना अधिक बळकटी देणारा ठरला आहे.

## फ्लिपकार्ट मिनिट्सचा दोन वर्षांत १,००० सूक्ष्म पूर्तता केंद्रांचा टप्पा

पुणे (दै. संध्या) :

देशातील आघाडीच्या ऑनलाइन विक्री व्यासपीठांपैकी एक असलेल्या फ्लिपकार्टच्या 'फ्लिपकार्ट मिनिट्स' या झटपट वितरण सेवेनं दोन वर्षांपेक्षा कमी कालावधीत १,००० सूक्ष्म पूर्तता केंद्रांचा टप्पा गाठला आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये सुरू झालेली ही सेवा आता १३० हून अधिक शहरे आणि ८,००० पेक्षा जास्त टपाल क्रमांक क्षेत्रांपर्यंत पोहोचली असून, मागील वर्षाच्या तुलनेत मागण्यांमध्ये तब्बल पाचपट वाढ नोंदविण्यात आली आहे. कंपनीच्या माहितीनुसार, मोठ्या शहरांसह दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्येही झटपट वितरण सेवेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः या बाजारपेठांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ४२ पट वाढ नोंदवली गेली असून, नव्या शहरांमध्ये विस्तार आणि स्थानिक पातळीवरील उपलब्धता यामुळे या वाढीस चालना मिळाली आहे. फ्लिपकार्ट समूहाचे वरिष्ठ उपाध्यक्ष हेमंत बद्री यांनी सांगितले की, १,००० सूक्ष्म पूर्तता केंद्रांचा टप्पा गाठणे हा महत्त्वाचा टप्पा असला तरी त्याहून महत्त्वाचे म्हणजे देशभरातील ग्राहक झटपट वितरण सेवेचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार करत आहेत. अधिक व्यापक पोहोच, अधिक पर्याय आणि सोयीसुविधांमुळे या क्षेत्राच्या वाढीला आणखी गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. फ्लिपकार्ट मिनिट्सचे प्रमुख कुणाल गुप्ता यांनी सांगितले की, दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी सुरू झालेली सेवा आता लाखो ग्राहकांच्या खरेदीच्या सवयींचा भाग बनली आहे.

## संजय राऊत यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून अटकेची मागणी

मुंबई (दै. संध्या) :



### मीना कांबळी यांचे मुंबई पोलिसांना निवेदन

शिवसेना नेत्या मीना कांबळी आणि शिवसेना उपनेते तथा प्रवक्ते शीतल म्हात्रे यांनी खासदार संजय राऊत यांच्याविरोधात मुंबई पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल करून गुन्हा नोंदविण्याची आणि तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे.

मुंबई पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनात संजय राऊत यांनी गेल्या चार वर्षांत सातत्याने अर्वाच्य भाषा, शिवीगाळ, महिलांचा अपमान आणि शिवसेना नेत्यांविरोधात खोटे व मानहानीकारक आरोप केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यांच्या वक्तव्यांमुळे महाराष्ट्राच्या सुसंस्कृत आणि वैचारिक राजकारणाच्या परंपरेला धक्का बसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

निवेदनानुसार, राऊत यांनी विविध पत्रकार परिषदांमधून आणि सार्वजनिक कार्यक्रमांतून विरोधकांवर तसेच शिवसेनेत सहभागी झालेल्या खासदारांवर आक्षेपार्ह भाषा वापरली. शिवसेनेच्या महिला लोकप्रतिनिधींबाबत अपमानास्पद उल्लेख केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. तसेच एका महिलेला फोनवरून अश्लील शिवीगाळ व धमकावणी केल्याची ऑडिओ क्लिप राज्यभर चर्चेत आल्याचा उल्लेखही निवेदनात करण्यात आला आहे.

याशिवाय पत्रकार परिषदेदरम्यान शिवसेना नेत्यांचा उल्लेख होताच कॅमेऱ्यासमोर 'थुंकण्याची' कृती करणे, शिवसेना नेते व आमदारांचा 'रेडे' असा उल्लेख करणे आणि हिंसक स्वरूपाची वक्तव्ये करणे, अशा आरोपांचाही निवेदनात समावेश आहे.

या सातत्यपूर्ण चिथावणीखोर वक्तव्यांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचे नमूद करत, राऊत यांनी केलेल्या सर्व आक्षेपार्ह विधानांची चौकशी करून संबंधित कायद्यांतर्गत तातडीने गुन्हा दाखल करावा व त्यांना अटक करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास शिवसेनेकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲंडी जॅसी यांनी भारतात घेतली माननीय पंतप्रधान मोदी यांची भेट

### २०२६-२०३० दरम्यान भारतात ४८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची घोषणा

पुणे (दै. संध्या) :

ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲंडी जॅसी यांनी आज नवी दिल्लीत माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. जॅसी यांनी ॲमेझॉनच्या भारताप्रती असलेल्या दीर्घकालीन कटिबद्धतेचा पुनरुच्चार केला आणि २०३० पर्यंत देशातील एआय आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरचा विस्तार करण्यासाठी अतिरिक्त १३ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची घोषणा केली. यामुळे २०२६ ते २०३० दरम्यान एआय आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरचा विस्तार व समर्थनासाठी ॲमेझॉनची एकूण नियोजित गुंतवणूक २१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त होईल, ज्यामुळे ॲमेझॉन देशातील सर्वात मोठा जागतिक एआय आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर गुंतवणूकदार म्हणून प्रस्थापित होईल. या गुंतवणुकीमुळे मुंबई आणि हैदराबादमधील एडब्ल्यूएस डेटा सेंटरची क्षमता वाढेल; ज्यामुळे स्टार्टअप्स, उद्योग आणि सरकारी संस्थांना सानुकूल एआय चिप्स, व्यवस्थापित एआय सेवा, सुरक्षित व विश्वासार्ह क्लाउड तंत्रज्ञान आणि डेव्हलपर टूल्स मिळतील, ज्यामुळे ते अधिक वेगाने नाविन्यता आणू शकतील, वेगाने विस्तार करू शकतील आणि जागतिक स्तरावर ग्राहकांना सेवा देऊ शकतील. २०१०-२०३० या कालावधीत ॲमेझॉनची भारतातील एकूण संचित गुंतवणूक ८८ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाली आहे. ॲमेझॉन आपल्या ई-कॉमर्स आणि क्विक कॉमर्स व्यवसायाला बळ देणाऱ्या ऑपरेशन्स नेटवर्कमध्ये गुंतवणूक सुरूच ठेवेल. कंपनीने या वर्षात २० हून अधिक नवीन फुलफिलमेंट सेंटर्स आणि १०० हून अधिक नवीन लास्ट माईल डिलिव्हरी स्टेशन्स सुरू करण्याचे नियोजन केले आहे, ज्यामुळे देशभरातील ग्राहकांना, विशेषतः



टियर ३ आणि ४ शहरांमध्ये जलद आणि विश्वासार्ह डिलिव्हरी मिळेल. याद्वारे ग्राहकांना अवघ्या काही मिनिटांत, तासांत आणि दुसऱ्या दिवशी डिलिव्हरीसह सर्वात वेगवान सेवा आणि उत्पादनांची सर्वात मोठी श्रेणी उपलब्ध करून दिली जाईल.

ॲमेझॉनने आपल्या ई-कॉमर्स आणि क्विक कॉमर्स नेटवर्कला चालना देणाऱ्या हजारो डिलिव्हरी असोसिएट्सच्या कल्याणावर लक्ष केंद्रित करणाऱ्या'सन्मान' या समर्पित उपक्रमाचीही घोषणा केली आहे. जॅसी यांनी पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाबद्दल त्यांचे आभार मानले आणि भारताचे वाढते महत्त्व अधोरेखित केले, जिथे ॲमेझॉन ई-कॉमर्स, एआय आणि क्लाउड आणि मनोरंजन यांसह अनेक व्यवसाय चालवते. ते म्हणाले की, कंपनीचा भारतातील व्यवसाय प्रबळ वाढीच्या मार्गावर आहे आणि विशेषतः ई-कॉमर्स आणि एडब्ल्यूएस व्यवसायात ग्राहकांकडून मोठी मागणी आहे. भारतात लाँच झाल्यापासून ॲमेझॉनने १२ दशलक्ष लहान व्यवसायांचे डिजिटायझेशन केले आहे, २० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त संचित ई-कॉमर्स निर्यातीला सक्षम केले आहे आणि २.८ दशलक्ष रोजगारांना पाठबळ दिले आहे. ॲमेझॉनने भारतातील १० दशलक्षाहून अधिक व्यक्तींना क्लाउड स्किल्सचे प्रशिक्षणही दिले आहे.

# मिलिंद खंडागळेंसह ११ कर्मचारी महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्काराने सन्मानित




Photo Credit : CPRO/CR

मुंबई (दै. संध्या) : रेल्वे प्रवाशांची सुरक्षा आणि रेल्वे परिचालन सुरळीत राखण्यासाठी सतर्कता, समयसूचकता आणि कर्तव्यनिष्ठेचे उत्कृष्ट उदाहरण घालून देणाऱ्या मध्य रेल्वेच्या ११ कर्मचाऱ्यांना जून २०२६ महिन्याचा 'महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांच्या हस्ते २२ जून रोजी हा सन्मान करण्यात आला.

पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांनी विविध प्रसंगी संभाव्य रेल्वे दुर्घटना टाळून प्रवासी आणि रेल्वे मालमत्तेची सुरक्षा सुनिश्चित केली. प्रत्येक पुरस्कारामध्ये पदक, प्रशस्तिपत्र, उत्कृष्ट संरक्षा कार्याचा गौरव करणारा लेख आणि रोख बक्षीस यांचा समावेश आहे. मुंबई विभागातील लोको पायलट मिलिंद खंडागळे (लोणावळा) यांची विशेष दखल घेण्यात आली. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी ठाकूरवाडी-कर्जत घाट विभागातून मालगाडी चालवत असताना त्यांना युटीएसएस-सीसीआयके ब्रेक प्रणाली निकामी झाल्याचे लक्षात आले. अत्यंत गंभीर परिस्थितीत प्रसंगावधान राखत त्यांनी गाडी सुरक्षितपणे थांबवली आणि संभाव्य मोठी दुर्घटना टाळली. त्यांच्या धाडस, अनुभव आणि कर्तव्यदक्षतेमुळे रेल्वे प्रशासनाने त्यांचा विशेष गौरव केला.

याच घटनेत ट्रेन मॅनेजर दशरथ सिंग यांनी एअर प्रेशर नियंत्रित करून गाडी थांबविण्यास मदत केली, तर रेल्वे उपव्यवस्थापक गौरव कुमार यांनी कर्जत यार्डाऐवजी मुख्य मार्ग मोकळा करून गाडीला सुरक्षित मार्ग उपलब्ध करून दिला.

मुंबई विभागातील हरिकृष्ण रेरे यांनी गाडी क्रमांक ११०६१ च्या डब्यातील सीबीसी नकलमधील तडा वेळेत शोधून काढला. नितेश कुमार यादव यांनी कळवा स्थानकाजवळ रुळाला गेलेला तडा निदर्शनास आणला, तर संतोष जाधव यांनी पॉइंट मशीनमधील तांत्रिक दोष वेळीच शोधून काढला. पुणे विभागातील एस. के. मंडल यांनी मिरज यार्डात ओएचई कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात येऊ शकणारी परिस्थिती ओळखून लोको इंजिन तात्काळ थांबवले. सातारा येथील आरपीएफ हेड कॉन्स्टेबल डी. टी. कोकले यांनी वादळी पावसात धोकादायक स्थितीत आलेल्या ध्वजस्तंभामुळे संभाव्य अपघात टाळला.

भुसावळ विभागातील रवींद्र गणवीर यांनी मालवाहू डब्यातील गंभीर तांत्रिक त्रुटी शोधून काढली, तर गेटमन बळीराम शंकर चौधरी यांनी 'हॉट ॲक्सल'ची समस्या ओळखून तातडीने उपाययोजना केल्या.

नागपूर विभागातील हिंगणघाटचे स्टेशन व्यवस्थापक सुरेश चंद मीना यांनी मालगाडीच्या वॅगनमधून निघणाऱ्या ज्वाळांवर त्वरित नियंत्रण मिळवत संभाव्य दुर्घटना टाळली.

यावेळी मध्य रेल्वेचे अपर महाव्यवस्थापक प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी चंद्र किशोर प्रसाद तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांनी पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करताना त्यांच्या सतर्कतेमुळे रेल्वे सुरक्षितता अधिक बळकट होत असल्याचे सांगितले. त्यांच्या कार्यातून इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


## पुणे महानगरपालिका

अद्वितीय & Unique

निविदा प्रकिया कक्ष

फेरनिविदा जाहिरात

**कामकाजाचे ठिकाण :** निविदा प्रक्रिया कक्ष, उपआयुक्त परिमंडळ क्र. ५ शिवाजी ढेरे उदयोग भवन, दुसरा मजला टिळकरोड, पुणे महानगरपालिका.

**विक्री कालावधी दिनांक :** २६/०६/२०२६ ते ०३/०७/२०२६ दुः २:०० पर्यंत

**स्विकृती कालावधी दिनांक :** २६/०६/२०२६ ते ०३/०७/२०२६ दु : २:०० पर्यंत

**निविदा उघडणे कालावधी दिनांक :** ०६/०७/२०२६

| अ. क्र. | खात्याचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय | PMC/DMC-5/ KASABA/2026/01-EX | कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पालखी सोहळ्यासाठी तात्पुरती प्रकाश व्यवस्था व विद्युत विषयक कामे करणे |

अ) वरील टेंडर्सची विक्री व स्विकृती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन फक्त ऑनलाईन चालू आहे.

ब) बाकी सर्व मजकुर पुर्वी प्रसिध्द केल्याप्रमाणे कायम राहील.

क) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि.) / ३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस/आर.टी.जी.एस/एन.ई.एफ.टी सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहेत.

जाहिरात क्र. १३-DC-५-२०२६

दिनांक : २५/०६/२०२६

सही/-
उप आयुक्त
परिमंडळ विभाग क्र.५ पुणे
महानगरपालिका, पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे...



### माजी नगराध्यक्ष दिवंगत अण्णासाहेब मगर यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड नगरीचे शिल्पकार तथा माजी नगराध्यक्ष दिवंगत अण्णासाहेब मगर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस तसेच पूर्णाकृती पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्या अनुराधा गोरखे, उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. माजी नगराध्यक्ष अण्णासाहेब मगर यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत आणि विकासासाठी दिलेले योगदान अनमोल असून त्यांच्या दूरदृष्टीमुळे शहराच्या प्रगतीचा भक्कम पाया रचला गेला, त्यांच्या कार्याचे,दूरदृषाटी व व्यापक विचारांचे स्मरण करून उपस्थितांनी त्यांचेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.



### निर्जला एकादशीनिमित्त श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात आकर्षक पुष्पसजावट

आळंदी (दैनिक संध्या) : निर्जला एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर परिसरात आकर्षक आणि मनमोहक पुष्पसजावट करण्यात आली. विविध रंगांच्या ताज्या फुलांनी सजविण्यात आलेल्या मंदिरामुळे परिसराला भक्तिमय आणि आल्हाददायक स्वरूप प्राप्त झाले आहे. एकादशी निमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच परराज्यांतून आलेल्या भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी केली. मंदिरातील समाधी परिसर, मुख्य सभामंडप आणि प्रवेशद्वार फुलांच्या देखण्या सजावटीने नटले होते. या आकर्षक सजावटीमुळे भाविकांचे विशेष लक्ष वेधले गेले. यावेळी भाविकांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे दर्शन घेत भक्तिभावाने पूजा-अर्चा केली. निर्जला एकादशीच्या निमित्ताने मंदिर परिसरात दिवसभर धार्मिक वातावरण असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.



### 'महाराष्ट्र रिक्षा पंचायत'च्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा दिमाखदार सत्कार

पिंपरी (दैनिक संध्या) : "ऑटो, टॅक्सी व कॅब चालक-मालक बांधव हे समाजाचा कणा आहेत. या कष्टकऱ्यांना समाजात प्रतिष्ठा मिळवून देणे, त्यांचा राजकीय व सामाजिक सन्मान जपून त्यांना हक्काचे अस्तित्व मिळवून देणे हेच 'महाराष्ट्र रिक्षा पंचायत'चे अंतिम ध्येय आहे. गेल्या २० वर्षांपासून आपली संघटना रिक्षा चालक, टॅक्सी-कॅब चालक आणि असंघटित कामगारांच्या ज्वलंत प्रश्नांसाठी सातत्याने लढा देत आहे," असे प्रतिपादन 'महाराष्ट्र रिक्षा पंचायत'चे संस्थापक अध्यक्ष गोरगरीब कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा कांबळे यांनी केले. चिखली गाव येथील ऐतिहासिक गणपती मंदिर मुख्य कमान परिसरात महाराष्ट्र रिक्षा पंचायतच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. बाबा कांबळे यांनी रिक्षा व्यवसायाच्या भविष्यातील वाटचालीवर प्रकाश टाकला. या सोहळ्यात पिंपरी-चिंचवड शहर अध्यक्ष श्री. विजय ढगारे, महाराष्ट्र राज्य प्रवक्ता श्री. धनंजय कुदळे आणि पिंपरी-चिंचवड शहर कार्याध्यक्ष श्री. दीपक ताटे यांना पगडी, शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.या नवीन नेतृत्वाकडून संघटनेच्या कार्याला नवीन गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### पिंपरी-चिंचवड शहरात 7 जुलैपर्यंत जमावबंदी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी पोलीस सह आयुक्त, सारंग आवाड यांनी प्राप्त अधिकाराचा वापर करुन व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 24 जून 2026 रोजी 00.01 पासून ते 7 जुलै 2026 रोजी 24 वाजेपर्यंत खाली नमूद केलेली कृत्य करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे. कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे. दगड अथवा शस्त्रे किवा अस्त्रे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे. शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे. कोणत्याही इसमाचे चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांचे चित्राचे प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे. मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे. ज्यामुळे सभ्यता अगर नितिमत्ता यास धोका पोहचेल किवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किवा अविर्भाव करणे कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे. ज्या योगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पध्दतीने कलम 37(1) व (3) विरुध्द वर्तन करणे. कलम 37 चे पोटकलम (3) अन्वये पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे, तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणे किंवा मिरवणुका काढणेस बंदी घालण्यात येत आहे. वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार वाळगणे आवश्यक आहे व त्याबाबत परवानगी आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 135 प्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

# मालमत्ताधारकांनी घेतला विविध सवलतींचा लाभ




पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर भरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सवलत योजनांना शहरातील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत आतापर्यंत सुमारे ३ लाख ८० हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला असून त्यापैकी ३ लाख ६२ हजार ५७ मालमत्ताधारकांनी महापालिकेच्या विविध सवलतींचा लाभ घेतला आहे. सवलतींचा लाभ घेण्यासाठी आता केवळ ५ दिवसांचा कालावधी शिल्लक असून नागरिकांनी ३० जून २०२६ पूर्वी कर भरून उपलब्ध सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

महापालिकेकडून ३० जून २०२६ पूर्वी मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांसाठी विविध प्रोत्साहनपर सवलती लागू करण्यात आल्या आहेत. यामध्ये ऑनलाईन आगाऊ कर भरण्यावर मिळणाऱ्या १० टक्के सवलतीला सर्वाधिक प्रतिसाद मिळाला असून ३ लाख ८ हजार ४५३ मालमत्ताधारकांनी डिजिटल माध्यमातून कराचा भरणा केला आहे. यामुळे नागरिकांचा ऑनलाइन सेवांकडे वाढता कल स्पष्टपणे दिसून येत आहे.

याशिवाय आगाऊ कर भरणा, महिला मालमत्ताधारक, दिव्यांग, माजी सैनिक, शौर्य पदकधारक, पर्यावरणपूरक उपक्रम राबविणारे तसेच प्रामाणिक करदाते अशा विविध गटांनाही महापालिकेच्या सवलत योजनांचा लाभ मिळाला आहे.

महापालिका क्षेत्रात सध्या ७ लाख ४४ हजारांहून अधिक मालमत्तांची नोंद असून त्यापैकी ३ लाख ८० हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी आतापर्यंत ४३६ कोटी २० लाख रुपयांचा मालमत्ता कर भरला आहे.

पिंपरी चिंचवडकरांनी वेळेत मालमत्ता कर भरून शहराच्या विकासात नेहमीच मोलाची भागीदारी नोंदवली आहे. यंदाही नागरिकांनी सवलत योजनांना दिलेला प्रतिसाद हा महापालिकेवरील विश्वासाचे प्रतीक आहे. प्रत्येक जबाबदार करदाता हा शहराचा विकास भागीदार आहे.
**- रवि लांडगे , महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

**३० जूनपर्यंत लागू असलेल्या सवलतींचा लाभ घेतलेले मालमत्ताधारक**

- ऑनलाईन आगाऊ भरणा – ३ लाख ८ हजार ४५३
- प्रामाणिक करदाता – ४६ हजार ९७३
- पर्यावरणपूरक सवलत – ४१ हजार ६४०
- आगाऊ भरणा – ३१ हजार ५११
- महिला – १६ हजार ३१४
- माजी सैनिक – ३ हजार ९९४
- दिव्यांग – १ हजार ७८२
- शौर्य पदकधारक – ३

**एकूण लाभार्थी – ३ लाख ६२ हजार ५७**

## शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत 'समर्थ'च्या पोस्टरचे भव्य अनावरण

पिंपरी (दै. संध्या)

समर्थ रामदास स्वामींची शिकवण, मनोपासना, बलोपासना आणि नव्या पिढीचा उत्स्फूर्त सहभाग अशा प्रेरणादायी वातावरणात आगामी 'समर्थ' या बहुप्रतीक्षित चित्रपटाच्या पोस्टरचे भव्य अनावरण पुण्यात पार पडले. पिंपरी-चिंचवडमधील निगडी प्राधिकरण येथील ज्ञानप्रबोधिनी प्रशालेत सुमारे अडीच हजार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा सोहळा विशेष उत्साहात संपन्न झाला.

समर्थ रामदासांनी दिलेल्या मनोपासना आणि बलोपासनेच्या शिकवणीचे प्रात्यक्षिक यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केले. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिकरित्या सूर्यनमस्कार घालत समर्थांच्या विचारांना मानवंदना दिली. तर मनाचे श्लोकमधील १३ श्लोकांचे एकसुरात पठण करत परिसर भक्तिमय आणि ऊर्जावान वातावरणाने भारून गेला होता. या अनोख्या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत 'समर्थ' चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. आजच्या पिढीला समर्थ रामदास स्वामींच्या विचारांशी जोडण्याचा हा एक आगळावेगळा प्रयत्न असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास सज्जनगड येथील श्री समर्थ रामदास स्वामी संस्थानचे प्रमुख बाळासाहेब स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमाला आशीर्वाद देण्यासाठी आदरणीय चंद्रतनय दादा उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रेरणादायी उद्बोधनातून समर्थ रामदास स्वामींच्या विचारांचा आणि तत्त्वज्ञानाचा आधार घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले व समर्थ विचारांचा संदेश दिला.

## भोसरीत बीएलओंना विशेष प्रशिक्षण : ३० जूनपासून घरभेटींद्वारे मतदार पडताळणी

पिंपरी (दै. संध्या)

२०७ भोसरी विधानसभा मतदारसंघातील विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेच्या तयारीसाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) आणि नवनियुक्त सहाय्यक मतदान नोंदणी अधिकाऱ्यांचे एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर आचार्य अत्रे रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आले. मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि त्रुटीरहित करण्याच्या उद्देशाने हे प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणात भारतीय निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या कालबद्ध कार्यक्रमाची माहिती देण्यात आली. प्रगणना पत्रक भरण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी तसेच घरभेटीदरम्यान घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



भोसरी विधानसभा मतदारसंघात सध्या ६ लाख ३६ हजार ४२४ मतदार असून मतदार यादीतील मॅपिंगचे प्रमाण ५८.६६ टक्के आहे. मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी ४८३ बीएलओ आणि ४८ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

३० जून ते २९ जुलै या कालावधीत बीएलओ घरभेटी देऊन मतदारांची माहिती पडताळणार आहेत. या वेळी प्रगणना पत्रके भरून घेण्यात येणार असून मतदार यादीतील नोंदी अद्ययावत करण्यासाठी आवश्यक माहिती संकलित केली जाणार आहे. मतदार नोंदणी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी सचिन पाटील यांनी सांगितले की, मतदार यादी अद्ययावत आणि त्रुटीरहित ठेवण्यासाठी घरभेटींच्या माध्यमातून माहिती संकलित केली जाणार आहे. नागरिकांनी प्रगणना पत्रकातील माहिती काळजीपूर्वक तपासून आवश्यक कागदपत्रांसह बीएलओंना सहकार्य करावे.

प्रगणना पत्रकात अद्ययावत मोबाईल क्रमांक नमूद करावा. कुटुंबातील सदस्यांचे मॅपिंग चुकीचे असल्यास अथवा इतर विसंगती आढळल्यास ती बीएलओंच्या निदर्शनास आणून द्यावी. आवश्यक तेथे संबंधित कागदपत्रे सादर करून विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसीलदार तथा तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी सतीश थेटे यांनी केले .

यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सहाय्यक आयुक्त तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी अजिंक्य येळे, परशुराम वाघमोडे, नायब तहसीलदार तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी विकी परदेशी हे देखील उपस्थित होते.

## दोषींवर मोक्का; मृतांच्या सर्व २२ कुटुंबांना प्रत्येकी ५ लाखांची मदत

पिंपरी (दै. संध्या)

- आमदार अमित गोरखे यांच्या लक्षवेधीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लिखित उत्तर
- गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सभागृहात केली महत्त्वपूर्ण घोषणा

पुणे व पिंपरी-चिंचवडमधील दापोडी, फुगेवाडी आणि हडपसर परिसरात घडलेल्या अत्यंत दुर्दैवी विषारी दारू प्रकरणावर आमदार अमित गोरखे यांनी महाराष्ट्र विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेद्वारे प्रकाश टाकला.. या गंभीर विषयाची दखल घेत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर लिखित उत्तर सभागृहात सादर केले असून त्यावर गृहराज्यमंत्री मा. नामदार योगेश कदम यांनी शासनाची भूमिका स्पष्ट करत कठोर कारवाई व महत्त्वपूर्ण निर्णयांची घोषणा केली.



आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई, मृतांच्या कुटुंबांना आर्थिक मदत, मिथेनॉल पुरवठा साखळीचा संपूर्ण तपास आणि राज्यातील अवैध दारू व्यवसायाविरोधात व्यापक मोहीम राबविण्याची मागणी केली. त्यांच्या या मागण्यांची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लिखित उत्तरामध्ये तपासाची सद्यस्थिती, दोषींवरील कारवाई तसेच भविष्यातील प्रतिबंधात्मक उपाययोजनांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लिखित उत्तरानुसार या संपूर्ण प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला असून विषारी दारू निर्मितीसाठी वापरण्यात आलेल्या मिथेनॉलचा पुरवठा करणाऱ्या मुख्य आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवरही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सभागृहात सांगितले की, या प्रकरणातील मुख्य आरोपींवर मोक्का (MCOCA) अंतर्गत कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दोषींना कोणतीही सवलत दिली जाणार नाही आणि संपूर्ण रॅकेट उद्ध्वस्त करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

याशिवाय विषारी दारूमुळे मृत्यू झालेल्या सर्व २२ कुटुंबांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार असून एकूण १ कोटी १० लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. पीडित कुटुंबांना तातडीचा दिलासा मिळावा यासाठी शासनाने ही मदत जाहीर केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या लिखित उत्तरात राज्यभर अवैध दारू निर्मिती, वाहतूक व विक्री रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले असून तालुकास्तरीय दारूबंदी समित्यांचे पुनर्गठन, पोलिस व उत्पादन शुल्क विभागाच्या संयुक्त कारवाया आणि मिथेनॉलच्या वाहतुकीवर अधिक कठोर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने ठोस पावले उचलल्याचे नमूद केले आहे.

यावेळी आमदार अमित गोरखे म्हणाले, "विषारी दारूमुळे २२ निष्पाप नागरिकांचा मृत्यू ही अत्यंत वेदनादायी आणि संतापजनक घटना आहे. मृतांच्या कुटुंबांना न्याय मिळावा, दोषींना कठोर शिक्षा व्हावी आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी मी सभागृहात ठाम भूमिका मांडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेत लिखित उत्तराद्वारे कठोर कारवाई व मदतीबाबत भूमिका स्पष्ट केली असून शासनाने घेतलेले निर्णय पीडित कुटुंबांसाठी दिलासादायक आहेत."




## गुटखा माफियांवर मोठी कारवाई; २० लाखांचा प्रतिबंधित माल जप्त

पिंपरी (दै. संध्या)


अन्न व औषध प्रशासनाने चिखली परिसरात मोठी धाड टाकत तब्बल २० लाख रुपयांहून अधिक किमतीचा प्रतिबंधित गुटखा आणि पान मसाला जप्त केला आहे. या कारवाईमुळे शहरातील गुटखा माफियांचे धाबे दणाणले असून, संबंधित आरोपींवर मकोकाअंतर्गत कारवाई करण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने चिखली येथील एका गोदामावर छापा टाकला. या कारवाईत मोठ्या प्रमाणात बंदी असलेला गुटखा व पान मसाल्याचा साठा आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत २० लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. प्राथमिक तपासात हा साठा रुस्तम खान आणि बाबर खान यांनी गोदामात साठवून ठेवल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच गौस मोयोद्दीन हा या प्रतिबंधित मालाचा पुरवठादार असल्याची माहिती समोर आली आहे. राणा प्रताप सिंग आणि देवराम दिवसे हे शहरात बेकायदेशीर गुटखा व पान मसाल्याच्या विक्रीचे मोठे रॅकेट चालवत असल्याचेही तपासातून उघड झाले आहे.

या प्रकरणाचे स्वरूप संघटित गुन्हेगारीचे असल्याने संबंधित सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव प्रशासनाकडून तयार करण्यात येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वेगाने सुरू असून, या रॅकेटशी संबंधित आणखी काही जणांची नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## राज्यातील मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा द्या : आमदार महेश लांडगे

पिंपरी (दै. संध्या)

कोरोना काळातील आर्थिक फटका, वाढते खर्च, परवानग्यांची गुंतागुंत आणि रोजगाराच्या अस्थिरतेचा सामना करणाऱ्या मंडप व्यवसायाला दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत. राज्यातील लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून असल्याने मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा, उद्योगाचा दर्जा आणि विविध कल्याणकारी सुविधांचा लाभ द्यावा, अशी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.




महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहाच्या अध्यक्षस्थानी विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे होते. यावेळी औचित्याचा मुद्दा सत्रात आमदार लांडगे यांनी राज्य शासनाचे लक्ष वेधले.

आमदार लांडगे म्हणाले की, मंडप व्यवसाय हा केवळ विवाह सोहळे, धार्मिक कार्यक्रम किंवा सामाजिक समारंभांपुरता मर्यादित नसून आपत्ती व्यवस्थापन, शासकीय कार्यक्रम, निवडणुका, आरोग्य शिबिरे, सांस्कृतिक उपक्रम तसेच विविध सार्वजनिक सेवांच्या आयोजनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतो. राज्यातील लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून असूनही या क्षेत्राला अद्याप अपेक्षित मान्यता आणि सुविधा मिळालेल्या नाहीत.

विधानसभेत मांडलेल्या मागण्यांमध्ये मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा देण्याबरोबरच उद्योगाचा दर्जा प्रदान करणे, परवानगी प्रक्रियेत सुलभता आणणे, एकात्मिक परवानगी व्यवस्था लागू करणे, कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविणे, विमा संरक्षण उपलब्ध करणे, कौशल्य विकास प्रशिक्षण देणे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ या क्षेत्रापर्यंत पोहोचविण्याची मागणी करण्यात आली.

कोरोना काळात मंडप व्यवसायाला मोठा आर्थिक फटका बसल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. अनेक व्यावसायिक आणि कामगारांना रोजगार गमवावा लागला होता. आजही वाढते खर्च, विविध परवानग्या, नियमांची गुंतागुंत आणि आर्थिक अडचणींमुळे हा व्यवसाय अनेक संकटांचा सामना करत असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील मंडप व्यवसायाशी संबंधित संघटना, कामगार आणि व्यावसायिकांच्या मागण्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे आमदार लांडगे यांनी स्पष्ट केले.

"मंडप व्यवसाय हा लाखो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधार आहे. या क्षेत्रातील कामगार, कारागीर आणि व्यावसायिकांना न्याय मिळवून देण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करणार आहे. मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा व उद्योगाचा दर्जा मिळावा, तसेच शासनाच्या सर्व सुविधा या क्षेत्रापर्यंत पोहोचाव्यात यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही मागणी करणार आहे. मंडप व्यवसाय वाचला तर लाखो हातांना काम मिळेल आणि हजारो कुटुंबांचा संसार सुरक्षित राहील. या क्षेत्राला सन्मान, संरक्षण आणि विकासाच्या संधी मिळवून देण्यासाठी शासनाकडे ठोस भूमिका घेण्याची मागणी आम्ही सातत्याने करत राहू.
**– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शिवाजी खांडेकर यांचे निधन

कान्हाटी (दैनिक संध्या) : श्री. शिवाजी रामचंद्र खांडेकर यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. वसतिगृह विद्यालय कान्हाटी येथे मराठी विषयावर प्रभुत्व असणारे शिक्षक म्हणून महाराष्ट्रभर सर्वांची ख्याती होती. त्यांच्या पाठीमागे पत्नी, मुलगा, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. डॉ. सचिन खांडेकर यांचे ते वडील होत.



### स्वामी कानपिळे पोलीस ठाण्याच्या शांतता कमिटीवर

चाकण (दैनिक संध्या) : चाकण पोलीस ठाण्याच्या विभाजनानंतर नव्याने अस्तित्वात आलेल्या चाकण दक्षिण पोलीस ठाण्याच्या शांतता कमिटी सदस्य पदावर येथील शिवसेनेचे युवक नेते स्वामीभाऊ शांताराम कानपिळे यांना काम करण्याची संधी मिळाली. चाकण दक्षिण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय सोळंके यांनी सांगितले की," दिवसेंदिवस विस्तारणाऱ्या चाकण भागात लोकसंख्येच्या तुलनेत नागरीकरण वाढत चालले आहे. रोजगाराच्या संधी येथे उपलब्ध होत असल्याने परप्रांतीय नागरिक चाकण भागात उदरनिर्वाहासाठी आले आहेत. बहुभाषिक नागरिक, परप्रांतीय तरुण आणि स्थानिक भूमिपुत्र यांच्यात मेळ बसणे अपेक्षित आहे. त्याच पार्श्वभूमीवर चाकण पोलीस ठाणे अंतर्गत नव्याने अस्तित्वात आलेल्या चाकण दक्षिण पोलीस ठाण्यात शांतता कमिटीची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये स्वतः पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी, पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक व स्थानिक भूमिपुत्रांना काम करण्याची संधी देण्यात आली आहे." स्वामी कानपिळे यांची सदस्यपदी निवड झाल्याने पोलीस उपनिरीक्षक रोहिदास मोरमारे, शिवसेनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते पांडुरंग बापू गोरे, विभाग प्रमुख शेखर नाना पिंगळे, सागर बवले, मनोज पांडे, प्रमोद टिळेकर आदींनी त्यांचे कौतुक केले.

### गुरुवारी शालेय साहित्य व खाऊ वाटप; प्रकाशभाऊ राजनकर यांनी दिली माहिती



चाकण (दैनिक संध्या) : शिवसेनेच्या वर्धापनदिनानिमित्त चाकण शहर शिवसेनेचे उपशहर प्रमुख व युवक नेते प्रकाशभाऊ राजनकर यांच्या पुढाकाराने रासे (ता. खेड) येथे गुरुवारी (दि.२५) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात येणार आहे. चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक नितीन गोरे यांच्या हस्ते व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर यांच्या अध्यक्षतेखाली रासे येथे गुरुवारी सकाळी अकरा वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेनेचे शहर उपप्रमुख प्रकाशभाऊ राजनकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मयूर मुंगसे व उपाध्यक्ष अजित शिंदे आदींच्या पुढाकारातून हा कार्यक्रम होणार आहे. याप्रसंगी युवा सेनेचे जिल्हाप्रमुख धनंजय पठारे, जिल्हा उपप्रमुख प्रकाश वाडेकर, जनसेवक श्रीनाथ लांडे, नगरसेवक महेश शेवकरी, उद्योजक श्यामभाऊ राक्षे, किरण कौटकर, अनिल लोहकरे, अभिजीत जाधव, मयूर भुरूक, शशिकांत जाधव, मंगेश कांडगे, विशालभाऊ नायकवाडी, राहुलदादा कांडगे, मुख्याध्यापिका प्रतिभा टकले, सरपंच नरेंद्र वाळुंज, विकीशेठ वाडेकर आदी उपस्थित राहणार आहेत.

### बारामतीत रविवारी 'दादा की यादें' कार्यक्रम

बारामती (दैनिक संध्या) : बारामती येथील नटराज नाट्य कला मंडळाच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतीदिनानिमित्त 'दादा की यादें' या विशेष हिंदी-मराठी गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंडळाचे अध्यक्ष किरण गुजर यांनी ही माहिती दिली. रविवारी (ता. २८) सायंकाळी ७ वाजता तिरंगा सर्कल येथील नटराज कला मंदिर येथे हा कार्यक्रम होणार आहे. अजितदादांच्या आठवणींना उजाळा देणाऱ्या या कार्यक्रमात हिंदी व मराठी गाण्यांची सुरेल मैफल रंगणार आहे. यामध्ये तेजस्विनी पाहुजा, धनंजय पवार आणि आकाश सोलंकी हे कलाकार सादरीकरण करणार असून, मुकेश देहिया संगीत संयोजन करणार आहेत.

### अवैध दारूविक्री विरोधात जुन्नर पोलिस ॲक्शन मोडवर

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गेल्या आठवड्यात अवैध हातभट्टी आणि बनावट दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध मोठी मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत सहा गुन्हे दाखल करण्यात आले असून, सात आरोपींवर कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांनी दिली. पुणे व पिंपरी चिंचवड शहरात गेल्या महिन्यात बनावट विषारी दारू प्रकरणात अनेकांना जीव गमवावा लागला होता. या पार्श्वभूमीवर, उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली. पोलिसांनी भिवाडे खुर्द, शिरोली, धालेवाडी, कारखाना फाटा आणि गोळेगाव परिसरात छापे टाकले. या कारवाईत लक्ष्मण निंबा शेकडे, एकनाथ कृष्णा शेकडे (दोघे रा. भिवाडे खुर्द), विशाल दिलीप शेळके (धनगरवाडी), सुधाकर भाऊराव कांबळे (पाडळी), सचिन बाबुराव पेंडे (येडगाव) आणि प्रणीत विठ्ठल देवाडे यांच्यासह सात जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यातील काही आरोपींना अटक करण्यात आली असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे. अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.



### पेढेविक्रेत्यांवर अन्न-औषधचा छापा; सहा विक्रेत्यांकडील पेढ्यांचे नमुने घेतले

अहिल्यानगर (दैनिक संध्या) : अन्न व औषध प्रशासन विभागाच्या भेसळ प्रतिबंधक पथकाने बुधवारी शिर्डीतील पेढेविक्रेत्यांवर छापेमारी केली. या कारवाईत सुमारे ५०० ते ६०० किलो पेढे तसेच अन्य मिठाईचे नमुने ताब्यात घेण्यात आले. देवस्थान परिसरातील आठ ते दहा दुकानांची तपासणी करण्यात आली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईत केवळ पेढे व काही पॅकबंद खाद्यपदार्थांचे नमुने जप्त करण्यात आले असून, अद्याप कोणत्याही विक्रेत्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नाही. जप्त केलेले नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार असून, त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल. काही दिवसांपूर्वी शिर्डीतील पेढे उत्पादन करणाऱ्या कारखान्यांवरही अन्न व औषध प्रशासनाने छापा टाकले होते. त्या कारवाईनंतर भेसळ प्रतिबंधक पथकाने पुन्हा एकदा विक्री केंद्रांवर धडक कारवाई केली. अचानक झालेल्या तपासणीमुळे पेढेविक्रेत्यांमध्ये एकच धावपळ उडाली. तपासणीदरम्यान पेढ्यांच्या विक्रीसंदर्भातील काही नियमांचे उल्लंघन झाल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले. तसेच पेढ्यांचा दर्जा, त्यामध्ये वापरण्यात आलेले घटक आणि अन्नसुरक्षा निकषांची पूर्तता झाली आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने संबंधित दुकानांचा पंचनामा करण्यात आला. मोठ्या प्रमाणात पेढे ताब्यात घेण्यात आले असले, तरी प्रयोगशाळेचा अहवाल येईपर्यंत कोणतीही अंतिम कारवाई करण्यात येणार नसल्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी समाज व सरकारने पुढे यावे : हेरंब कुलकर्णी

शिरूर (दै. संध्या)



एकल महिलांचे दुःख, समस्या आणि सामाजिक-आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी समाज व सरकारने संवेदनशीलपणे पुढाकार घेत त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा राज्याच्या एकल महिला धोरण निर्धारण समितीचे सदस्य हेरंब कुलकर्णी यांनी केले.

शिरूर नगरपरिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने जुन्या नगरपरिषद कार्यालयात 'एकल महिला दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजित पाचर्णे, मुख्याधिकारी प्रीतम पाटील, उपनगराध्यक्ष मितेश गादिया, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती आयेशा सय्यद, उपसभापती स्वप्नाली जामदार, पाणीपुरवठा समितीच्या सभापती डॉ. सुनीता पोटे, लोकशाही क्रांती आघाडीचे अध्यक्ष रवींद्र धनक, सामाजिक कार्यकर्त्या उषा वाखारे, वुमन्स फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रिया बिरादार प्रत्युष कंपनीचे राहुल बिरादार, राजेश पाटील, महिला व बालकल्याण विभागाच्या शितल काळे , स्वच्छता निरीक्षक दत्तात्रेय बर्गे तसेच नगरसेविका व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. हेरंब कुलकर्णी म्हणाले की, शिरूर नगरपरिषदेने एकल महिलांचे सर्वेक्षण करून त्यांचे प्रश्न समजून घेण्याचा केलेला प्रयत्न कौतुकास्पद आहे. एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी सर्वांनी पुढाकार घेणे आवश्यक असून त्यांच्या समस्या व गरजांची स्वतंत्र यादी तयार केली पाहिजे. अनेक महिलांकडे विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे नसतात. ती कागदपत्रे त्यांना सहज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था शासनाने करावी. विधवा संदर्भातील समाजातील जुन्या वाईट प्रथा-परंपरा सोडून देण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी एकल महिलांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हेच त्यांच्या पुनर्वसनाचे प्रभावी माध्यम असल्याचे नमूद केले. शिरूर नगरपरिषदेने एकल महिलांसाठी रोजगारनिर्मितीचे आदर्श मॉडेल उभे करावे तसेच वार्षिक अर्थसंकल्पातील किमान एक टक्का निधी त्यांच्या रोजगारासाठी राखून ठेवावा, अशी मागणी त्यांनी केली. राज्यस्तरावर एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याचे काम सुरू असून बचत गटांच्या माध्यमातूनही त्यांचे सक्षमीकरण करता येईल, असे ते म्हणाले. नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी सांगितले की, एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी तसेच त्यांना हक्क, अधिकार आणि शासकीय योजनांची माहिती पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी, बचत गट, आर्थिक स्वावलंबन आणि महिलांसाठी उपलब्ध सुविधांची माहिती तज्ज्ञांकडून देण्यात आली. तसेच महिलांना त्यांच्या समस्या, अडचणी आणि अपेक्षा मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

एकल महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिरूर नगरपरिषद कटिबद्ध असून त्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात उपस्थित महिलांनी विविध विषयांवर मते मांडत आपल्या अडचणी प्रशासनासमोर मांडल्या.




## चाकणजवळ गावठी कट्ट्यांसह दोघे गजाआड

चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील उत्तर महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत भामचंद्र डोंगर पायथ्याशी पिंपरी - चिंचवड गुन्हे शाखा युनिट चारच्या पथकाने मंगळवारी (दि.२३) धडक कारवाई करत दोघांना जेरबंद केले. त्यांच्या ताब्यातून दोन देशी बनावटीचे गावठी कट्टे जप्त करण्यात आले आहेत. गुन्हे शाखा युनिट चारच्या पथकाला उत्तर महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाणे परिसरातील भामचंद्र डोंगर पायथ्याशी काही व्यक्ती अवैधरित्या शस्त्र बाळगत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी परिसरात सापळा रचून संशयितांची तपासणी केली. यावेळी कमलाकर राजेंद्र साळवे (वय - २०, रा. आंबेठाण, ता. खेड, मूळ रा. अहिल्यानगर) याला अटक करण्यात आली. त्याच्या सोबत असलेल्या एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे ८० हजार रुपये किमतीचे दोन देशी बनावटीचे गावठी कट्टे आढळून आले. जप्त करण्यात आलेल्या शस्त्रांचा वापर कोणत्या उद्देशाने केला जाणार होता, तसेच ही शस्त्रे आरोपींनी कुठून आणली, याचा तपास पोलीस करत आहेत.



## जुन्नर नगरपालिकेमध्ये एकल महिला दिवस साजरा

जुन्नर (दै. संध्या)

महिलांचे सक्षमीकरण, विधवा परीतक्त्या महिलांचे असलेले प्रश्न यांचा सखोल अभ्यास करून त्यावर उपाययोजना करणे संदर्भात शासन निर्देशानुसार जुन्नर नगरपालिकेमध्ये एकल महिला दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या शीतलताई ठुसे यांनी उपस्थितांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले. तसेच एकल महिला समिती सदस्य हेरंब कुलकर्णी व रूपश्री महिला विकास संस्था यांच्या अध्यक्षा अश्विनीताई नवले यांनी आपले विचार मांडले. यावेळी जुन्नर नगरपरिषदचे मुख्याधिकारी चरणजी कोल्हे,नगराध्यक्षा सुजाताताई काजळे,उपनगराध्यक्षा रुपालताई परदेशी, राष्ट्रवादी गटनेत्या वैष्णविताई पांडे, नगरसेविका अनुजाताई पातुरकर, अलकाताई फुलपगार व शहरातील महिला भगिनीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

## अकोले येथे बदलत्या हवामानाचा शेतीवर परिणाम याविषयी चर्चासत्र

भिगवण (दै. संध्या)



अकोले- (ता.इंदापूर) येथे हवामान अंदाज व एल निनो बदलत्या हवामानाचा शेतीवर काय परिणाम होऊ शकतो त्या अनुषंगाने कृषी विभाग व राष्ट्रीय अजैविक तण व्यवस्थापन संस्था बारामती आणि कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.


यामध्ये शेतकऱ्यांनी काय खबरदारी घ्यावी तसेच माती परीक्षण व गट शेती जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी माती परीक्षण करण्याचे महत्त्व सांगून गट स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.तसेच सेंद्रिय व जैविक शेतीवर भर देऊन रासायनिक खताचा खर्च कमी करण्यासाठी हिरवळीचे खते निंबोळी अर्क दशपर्णी ,अर्क जीवामृत आणि घन जीवामृत यांसारख्या घरगुती जैविक निविष्टाचा वापर वाढवावा. व पेरणीपूर्वी पूर्वतयारी खरीप पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करणे बियाणे उगवण क्षमता तपासणे आणि रुंद वरंबा सरी पद्धतीने पेरणी करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा.सरकारी योजनासाठी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज कसा करावा तसेच एससी, एससी प्रवर्गातील शेतकऱ्यांचे अर्ज वाढवून त्यांना शासकीय योजनेचा जास्तीत जास्त लाभ कसा मिळवून देता येईल याविषयी शेतकऱ्यांशी चर्चा झाली.तंत्रज्ञानाचा वापर महाविस्तार हे एआय ॲप आधुनिक शेतीकडे पाऊल टाकत आहे. यामुळे मोबाईलवर शेतकरी नोंदणी कशी करावी हे प्रात्यक्षिक यावेळी सांगण्यात आले. यावेळी उपकृषी अधिकारी खंडागळे सर , सरडे साहेब व सहाय्यक कृषी अधिकारी अर्जुन धोत्रे यांनी मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी ज्ञानदेव दराडे, बाबासो दराडे, संतोष गायकवाड, दत्तात्रय दराडे, नारायण दराडे, संदीप सुबनावळ,राम दराडे,जयदीप दराडे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यावतीने झाडांचे वाटप

चाकण (दै. संध्या)

माझे वृक्ष, माझी जबाबदारी या अभियानाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, या अभियानांतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने चाकण येथे झाडांचे वाटप करण्यात आले.

झाडांचे वाटप करण्याबरोबरच नागरिकांना कापडी पिशव्यांचेही वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाबरोबरच प्लास्टिकमुक्त चाकण घडविण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. वनविभाग चाकण व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा चाकण नगरपरिषदेचे शिवसेना गटनेते नितीन गोरे यांच्या संयुक्त विद्यमाने तब्बल दोन हजार झाडांचे मोफत वाटप करण्यात आले. नागरिकांनी ही झाडे स्वीकारून त्यांचे संगोपन करण्याचा निर्धार केला आहे.




याप्रसंगी मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, पर्यावरण प्रेमी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा नगरसेवक नितीन गोरे यावेळी म्हणाले," वृक्षारोपण हे केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समृद्ध पर्यावरण निर्माण करण्याची चळवळ आहे. आपण लावलेले प्रत्येक झाड हे आपल्या मुलांच्या भविष्याची गुंतवणूक आहे.

माझे वृक्ष, माझी जबाबदारी ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजली पाहिजे. एक झाड आईसाठी या उपक्रमातून प्रत्येकाने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून त्याचे जतन करण्याचा संकल्प करावा."

> "चाकण नगरपरिषद हद्दीतील ज्या प्रभागात लावलेल्या झाडांचे सर्वाधिक संगोपन होईल व जिवंत राहण्याचे प्रमाण सर्वाधिक असेल, त्या प्रभागाला पुढील वर्षी पारितोषिक देण्यात येणार आहे"
> **- नितीन गोरे, सदस्य, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,.**

## गोवामुक्ती आंदोलनापासून नेतृत्वाचे धडे : शरद पवार

अहिल्यानगर (दै. संध्या)

"विद्यार्थिदशेत गोवामुक्ती आंदोलनात सक्रिय सहभाग घेतल्यानेच आपल्या सार्वजनिक जीवनातील संघर्षाची सुरुवात झाली," अशी आठवण रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी सांगितली. रयत शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील महात्मा गांधी विद्यालयातील विविध इमारतींचे उद्घाटन तसेच 'पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार सभागृह' भूमिपूजन समारंभ बुधवारी (ता. २४) पार पडला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या वेळी अध्यक्षस्थानी आमदार दिलीप वळसे पाटील होते. तसेच खासदार नीलेश लंके, माजी आमदार बाळासाहेब थोरात, डॉ. सुधीर तांबे, मीनाताई जगधने, डॉ. चंद्रकांत दळवी, कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, भगीरथ शिंदे, रावसाहेब म्हस्के, अरुण कडू व एकनाथ घोगरे उपस्थित होते.

पवार म्हणाले, "मी प्रवरानगर येथील रयतच्या शाळेत शिकत असताना गोवामुक्ती संग्राम सुरू होता. ना. ग. गोरे, मधु दंडवते आणि हिरवे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू होते. त्यावेळी विद्यार्थ्यांना एकत्र करून आम्ही प्रवरा साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर गेलो होतो. आंदोलनाला पाठिंबा म्हणून कारखाना बंद ठेवण्याची विनंती प्रशासनाकडे केली होती. त्यावेळी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी, 'कारखाना बंद ठेवल्याने गोवामुक्ती होणार असेल, तर आम्हाला हरकत नाही,' असे सांगितले होते."

# 'सावित्रीबाई जोतीराव फुले' मालिकेत झळकणार शिरूरची अनघा शिंदे

शिरूर (दै. संध्या)

महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणासाठी पेटवलेल्या ज्ञानदीपाचा उजेड आजही नव्या पिढीला प्रेरणा देत आहे. या महान कार्याची गाथा सांगणाऱ्या 'सावित्रीबाई जोतीराव फुले' या मालिकेत शिरूरच्या अवघ्या नऊ वर्षांच्या अनघा अश्विनी प्रसाद शिंदे हिची निवड झाल्याने शिरूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

'जगदंब क्रिएशन' निर्मित आणि 'मराठी वारसा' या यूट्यूब वाहिनीवर प्रसारित होत असलेल्या या मालिकेत अनघा सावित्रीबाईंनी सुरू केलेल्या भारतातील पहिल्या मुलींच्या शाळेतील विद्यार्थिनी माधवी थत्ते हिची भूमिका साकारत आहे. शिक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या त्या काळातील मुलींचे आयुष्य आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणादायी कथा या मालिकेतून उलगडणार आहे.

शिरूर येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता चौथीत शिक्षण घेणाऱ्या अनघाने कोणतेही औपचारिक अभिनय प्रशिक्षण न घेता आपल्या नैसर्गिक अभिनयाच्या बळावर ही संधी मिळवली आहे. या भूमिकेसाठी राज्यभरातील सुमारे साडेतीन हजार मुलींनी सहभाग नोंदवला होता. कठीण स्पर्धेतून निवड होऊन अनघाने आपली वेगळी छाप पाडली. खासदार आणि अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांनी समाजमाध्यमांद्वारे निवड झालेल्या सहा विद्यार्थिनींची नावे जाहीर केली असून त्यामध्ये अनघाचा समावेश आहे.




अनघाचे वडील प्रसाद शिंदे हे विद्याधाम प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत आहेत, तर आई अश्विनी शिंदे या गृहिणी आहेत. शिक्षण आणि सामाजिक मूल्यांचा समृद्ध वारसा लाभलेल्या कुटुंबातील अनघा ही रयत शाळेतील दिवंगत शिक्षक हिंदुराव शिंदे व दिवंगत शिक्षिका शालिनी शिंदे यांची नात आहे. तसेच शिरूर नगरपरिषदेच्या शिक्षण मंडळाचे माजी सभापती प्रशांत शिंदे आणि समर्थ पॅथॉलॉजीचे उदय शिंदे यांची ती पुतणी आहे.

विशेष म्हणजे, ज्या महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिक्षणाचा हक्क मिळावा यासाठी आयुष्य वेचले, त्यांच्या जीवनकार्यावर आधारित मालिकेत भूमिका साकारण्याची संधी मिळणे हे अनघासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. "सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित मालिकेत काम करण्याची संधी मिळाल्याने मला खूप आनंद होत आहे. त्यांच्या कार्यामुळेच आज आम्हा मुलींना शिक्षण घेता येत आहे," अशा भावना अनघाने व्यक्त केल्या.

अनघाच्या या यशामुळे शिरूर शहरासह शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ज्ञान, जिद्द आणि स्वप्नांच्या बळावर एका छोट्याशा शहरातील मुलगी आज इतिहास घडवणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या कथेत स्वतःची भूमिका साकारत आहे, ही बाब शिरूरकरांसाठी अभिमानाची ठरत आहे. तिच्या या यशामुळे अनेक विद्यार्थिनींना नवी प्रेरणा मिळणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# परभणी जिल्ह्यात अत्याधुनिक आरोग्य सुविधा उभारणीस गती देणार

**राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर**



■ मुंबई (दै. संध्या)

परभणी जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण आणि अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभागाशी संबंधित प्रस्ताव तातडीने मार्गी लावावेत तसेच सर्व कामांना गती द्यावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले. परभणी जिल्ह्यातील आरोग्य विभागासंदर्भातील विविध प्रलंबित प्रस्तावांसंदर्भात आढावा बैठकीचे आयोजन एमएसआरडीसी कार्यालय, निर्मल भवन येथे करण्यात आले होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर होत्या. बैठकीत जिल्ह्यातील आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन, ५० खाटांच्या नशामुक्ती केंद्राची उभारणी, विविध आरोग्य संस्थांमध्ये मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, मॉड्युलर लेबर रूम आणि अन्य अत्याधुनिक सुविधांच्या माध्यमातून दर्जोन्नती, सेलू येथे अत्याधुनिक कॅथलॅब स्थापन करणे तसेच परभणी जिल्हा रुग्णालय, येथे रोबोटिक सर्जरी सेवा उपलब्ध करून देणे या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी परभणी जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालये जागतिक दर्जाच्या वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले. सोनपेठ ट्रॉमा केयर सेंटर, गंगाखेड येथील महिला रुग्णालयाच्या प्रस्तावावर देखील यावेळी सविस्तर चर्चा झाली. तसेच जिंतूर येथे १०० खाटांचे महिला रुग्णालय, सेलू येथे १०० खाटांचे सुसज्ज उपजिल्हा रुग्णालय आणि बोरी येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारणीसंदर्भातील प्रस्तावांनाही गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले. परभणी येथे अत्याधुनिक रोबोटिक सर्जरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव तयार करून सादर करावा तसेच त्यासाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्यात यावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

परभणी जिल्ह्यातील नागरिकांना अधिक सक्षम, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक, तसेच उपसंचालक यांनी प्रत्यक्ष जिल्हा भेट देऊन आरोग्य सुविधांचा आढावा घ्यावा आणि आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देशही राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले. परभणी जिल्ह्यातील आरोग्य सुविधांचा सर्वांगीण विकास करून सर्वसामान्य नागरिकांना आधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यास शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. बैठकीस आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, रुग्णालये सह संचालक डॉ. सुनीता गोल्हाईत तसेच आरोग्य विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# ‘दिलखुलास’मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्याचा वेध

■ मुंबई (दै. संध्या)



माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित ‘दिलखुलास’ कार्यक्रमात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विशेष मुलाखतीचे प्रसारण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक, अर्थतज्ज्ञ तथा राजर्षी शाहू महाराज यांचे अभ्यासक डॉ. जे.के.पवार यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. ‘दिलखुलास’ कार्यक्रमात ही मुलाखत शुक्रवार २६ जून, शनिवार, २७ जून आणि सोमवार, २९ जून २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन आणि ‘न्यूज ऑन एआयआर’ या मोबाईल ॲपवर प्रसारित होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोल्हापूर विभागीय माहिती कार्यालयाच्या सहायक संचालक वृषाली पाटील यांनी केले आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय, शिक्षण, कृषी, महिला सक्षमीकरण, सहकार, उद्योग, ग्रामविकास, कला, संस्कृती, क्रीडा आणि पत्रकारिता क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा या मुलाखतीत सविस्तर उहापोह करण्यात आला आहे. तसेच त्यांच्या लोककल्याणकारी राज्यकारभाराचा, समतेच्या विचारांचा आणि आजच्या काळातील त्यांच्या कार्याच्या प्रेरणादायी वारशाचाही वेध घेण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या पहिल्या भागात सामाजिक न्याय दिनाचे महत्व, राजर्षी शाहू महाराजांचा लोकाभिमुख राज्यकारभार, शिक्षण क्षेत्रातील त्यांचे क्रांतिकारी योगदान आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. दुसऱ्या भागात कृषी, जलसंधारण, सहकार, उद्योग, रोजगारनिर्मिती, ग्रामविकास, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेल्या दूरदर्शी कार्याचा वेध घेण्यात आला आहे. तर तिसऱ्या भागात कला, संस्कृती, क्रीडा, पत्रकारिता आणि समाजप्रबोधनासाठी दिलेल्या योगदानासह त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचा आणि आजच्या तरुण पिढीसाठी त्यांच्या विचारांच्या मार्गदर्शक मूल्यांचा उलगडा डॉ. जे.के. पवार यांनी केला आहे.

# चिंचवड मध्ये ‘अजितसृष्टी’ उभारण्याचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)




**एमआयडीसीचे प्लॉटिंग तात्काळ थांबवावे- उपाध्यक्ष अण्णा बनसोडे**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरक्षित जागेवर स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याची आणि आठवणींची जपणूक करणारी ‘अजितसृष्टी’ उभारण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, तसेच संबंधित जागेवरील एमआयडीसीचे प्लॉटिंग तात्काळ थांबवावे, असे निर्देश महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.

विधानभवन येथील उपाध्यक्ष कार्यालयाच्या दालनात आयोजित बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात चिंचवड येथील आरक्षण क्रमांक ३०१ ही जागा पर्यटन केंद्रासाठी राखीव असून जुन्या तसेच नव्या प्रारूप विकास आराखड्यातही हे आरक्षण कायम आहे. सद्यस्थितीत ही जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

मात्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) या जागेवर प्लॉटिंग करून ती खाजगी उद्योजकांना विक्री करण्याचे नियोजन केल्याची बाब निदर्शनास आली आहे. विकास आराखड्यातील आरक्षणाला बाधा पोहोचविणारे हे नियोजन रद्द करण्यात यावे, असे निर्देश उपाध्यक्ष बनसोडे यांनी बैठकीत दिले. या परिसरात मोठ्या प्रमाणात निवासी वस्ती असून शाहूनगर परिसरात एमआयडीसीने कामगारांसाठी घरे योजना राबविलेली आहे. त्यामुळे पर्यटन केंद्रासाठी आरक्षित असलेल्या जागेचे मूळ स्वरूप कायम ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या जागेवर सुरू असलेले प्लॉटिंगचे काम तातडीने थांबवून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने विकास आराखड्यातील पर्यटन केंद्राचे आरक्षण कायम ठेवावे व त्याठिकाणी ‘अजितसृष्टी’ उभारण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले. बैठकीस पिंपरी-चिंचवड एमआयडीसीचे मुख्य अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# जवाहर बाल भवनला शिक्षणमंत्र्यांची अचानक भेट

■ मुंबई (दै. संध्या)



**विद्यार्थ्यांच्या कला, सर्जनशीलता आणि कौशल्यांचा घेतला आढावा**

राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी आज मुंबईतील चर्नी रोड येथील जवाहर बाल भवनाला अचानक भेट देऊन विद्यार्थ्यांच्या विविध कलाविष्कारांचा आढावा घेतला. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे कामकाज सुरू असतानाही वेळात वेळ काढून त्यांनी बालभवनाला भेट दिली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक आणि सर्जनशील उपक्रमांचे सादरीकरण केले. अनेक विद्यार्थ्यांनी छोट्या-छोट्या नाटिका सादर करून सामाजिक, शैक्षणिक आणि नैतिक मूल्यांवर आधारित संदेश दिले. काही विद्यार्थ्यांनी गीतगायनाद्वारे आपल्या गायनकौशल्याची झलक दाखवली. तसेच शिल्पकला, रंगकला आणि हस्तकलेच्या विविध कलाकृती सादर करून विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचे आणि सर्जनशीलतेचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट कलाविष्कारांनी शिक्षणमंत्री दादाजी भुसे अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. यावेळी बोलताना मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, शिक्षण हे केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे. शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळणे अत्यंत आवश्यक आहे. कला, संस्कृती, संगीत, नाट्य, चित्रकला, शिल्पकला यांसारख्या विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण विकसित होतात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, विचारशक्ती समृद्ध होते आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. जवाहर बाल भवन हे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, कलागुण, नेतृत्वगुण आणि विविध कौशल्यांच्या विकासासाठी कार्यरत असलेले महत्त्वपूर्ण केंद्र आहे. विद्यार्थ्यांच्या कलात्मक आणि बौद्धिक क्षमतांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या कल्पनांना योग्य दिशा देणे आणि त्यांच्यातील प्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा बालभवनाचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध उपक्रमांचे आणि कलाकृतींचे त्यांनी मनापासून कौतुक केले.

याप्रसंगी अंजुमन-ए-इस्लाम माध्यमिक विद्यालय, दादर तसेच गुरुनानक माध्यमिक विद्यालय, दादर येथील विद्यार्थी, शिक्षक व बालभवनातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# फिनलंडच्या प्रतिनिधींसोबत मंत्री नितेश राणे यांची चर्चा

■ मुंबई (दै. संध्या)



मुंबईतील ससून डॉकच्या डिजिटायझेशन आणि आधुनिकीकरण संदर्भात मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी फिनलंडच्या उप-महावाणिज्यदूत इव्हा निल्सन तसेच फिनलंडस्थित सुरक्षा व व्हिडिओ व्यवस्थापन तंत्रज्ञान क्षेत्रातील मिरासिस कंपनीचे प्रतिनिधी अरिंदम सरकार यांच्यासमवेत सविस्तर चर्चा केली. यावर्षीच्या सुरुवातीला मुंबईतील फिनलँड वाणिज्य दूतावासासोबत झालेल्या ससून डॉक्स विकासासंदर्भातील सामंजस्य कराराचा आढावा यावेळी घेण्यात आला. बैठकीस महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खापले तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत ससून डॉक परिसरात अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था, स्मार्ट ऑपरेशन्स, पर्यावरणीय व्यवस्थापन, ब्लॉकचेन आधारित दस्तऐवज पडताळणी आणि मनुष्यबळ व्यवस्थापनाच्या विविध उपाययोजनांवर चर्चा झाली. सुमारे १८० पीटीझेड, बुलेट आणि एएनपीआर कॅमेऱ्यांच्या माध्यमातून संपूर्ण परिसराचे निरीक्षण, केंद्रीकृत व्हिडिओ मॅनेजमेंट सिस्टम आणि निर्णय सहाय्यक बुद्धिमत्ता प्लॅटफॉर्म उभारण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. यामुळे ससून डॉक परिसरातील सुरक्षा अधिक बळकट होण्यास मदत होणार असून बोटींची हालचाल, वाहन व्यवस्थापन, गर्दीचे विश्लेषण आणि अपघात प्रतिबंधासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होणार आहे. तसेच डिजिटल लिलाव प्रणाली, पुरवठा साखळी व्यवस्थापन, मोबाईल ॲप आधारित सेवा आणि सेन्सर तंत्रज्ञानाद्वारे मत्स्यव्यवसायाशी संबंधित व्यवहार अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यावर भर देण्यात आला. पर्यावरणीय दृष्टीने स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि त्यावरील देखरेखीसाठी आधुनिक प्रणाली विकसित करण्याबाबतही चर्चा झाली. याशिवाय ब्लॉकचेन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने बोट परवाने, कामगार ओळखपत्रे आणि निर्यात दस्तऐवजांची जलद व सुरक्षित पडताळणी करण्याची व्यवस्था उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.

# ॲमेझॉनला महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या मोठ्या संधी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँड्री जेसी यांची मुख्यमंत्र्यांशी भेट**

■ मुंबई (दै. संध्या)



‘डेटा सेंटर्स’ क्षेत्रात महाराष्ट्र ही देशाची राजधानी आहे. डेटा सेंटरचा विस्तार आणि विकासासाठी राज्यात उत्तम परिसंस्था निर्माण करण्यात येत आहे. केवळ डेटा सेंटर्स नाही, तर राज्यात आरोग्य, तंत्रज्ञान विषयक पायाभूत सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कौशल्य विकास यामध्ये मोठ्या गुंतवणुकीच्या संधी आहेत. त्यामुळे ॲमेझॉनने राज्यामध्ये गुंतवणूक करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हॉटेल ताज पॅलेस येथे ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँड्री जेसी यांच्या समवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील गुंतवणुकीच्या संधीवर चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बळगन, विकास आयुक्त (उद्योग) कादंबरी बलकवडे, ॲमेझॉन एडब्ल्यूएसचे कंट्री हेड संदीप दत्ता, ॲमेझॉन ग्लोबलचे कंट्री हेड समीर कुमार, एडब्ल्यूएसचे पब्लिक पॉलिसी संचालक विक्रम श्रीधरन, ग्लोबल ॲमेझॉनचे उपाध्यक्ष धर्मेश मेहता उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने देशातील अग्रणी राज्य आहे राज्याची अर्थव्यवस्था ६६० अब्ज डॉलर्स इतकी आहे. राज्याने २०३० पर्यंत ‘ वन ट्रिलियन डॉलर’ अर्थव्यवस्था होण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यापैकी अर्धे अधिक उद्दिष्ट राज्याने पार केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगावर आधारित विविध प्रयोग राज्याच्या शासन व्यवस्थेमध्ये करण्यात येत आहे. त्यामुळे निश्चितच नागरिकांना सुलभ आणि सहजरित्या शासकीय सेवांचा लाभ देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. कृषी, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित व्यवस्थांची उभारणी करण्यात येत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगाने रोजगाराच्या स्वरुपामध्ये बदल होत आहेत. त्यामुळे या तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्र कौशल्य विकासामध्ये ॲमेझॉनसोबत काम करण्यास इच्छुक आहे. यासोबतच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये महाराष्ट्र देशात अव्वल आहे. या क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगावर आधारित कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात महाराष्ट्रात आवश्यक असलेली परिसंस्था विकसित करण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे डेटा सेंटर विकसित करण्यासाठी देण्यात येणाऱ्या सुविधांचा विस्तार करीत आहे. तसेच ‘सार्वजनिक क्लाउड धोरण’ लागू करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे. यामध्ये यापूर्वीच ॲमेझॉनसोबत शासनाने पब्लिक क्लाऊडमध्ये काम केले आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी राज्याने स्वतःची डेटा सेंटर धोरण जाहीर केले आहे. ज्यामध्ये ‘ ग्रीन डेटा सेंटर’ चा समावेश आहे. डेटा सेंटरसाठी पारंपारिक ऊर्जेच्या उपयोगाऐवजी अपारंपारिक क्षेत्रातून ऊर्जेचा उपयोग करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. ग्रीन डाटा सेंटरसाठी राज्याने सवलतीपण दिल्या आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे




### कला इतिहास दस्तावेजीकरणावर चर्चा

मुंबई (दैनिक संध्या) : कला इतिहासकार व लेखक संदीप दहिसरकर यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची महाराष्ट्र लोक भवन येथे भेट घेऊन त्यांना आपल्या दोन नव्या पुस्तकांच्या प्रती भेट दिल्या. यावेळी दहिसरकर यांनी आपल्या ‘अ कपल ऑफ डिफरंट स्ट्रोक्स: व्ही बी पाठारे अँड प्रेमा व्ही पाठारे’ तसेच ‘राव बहादूर एम व्ही धुरंधर: अ पेंटर फ्रॉम द बॉम्बे स्कूल ऑफ आर्ट’ या दोन पुस्तकांची माहिती दिली. यावेळी त्यांनी पाठारे दाम्पत्याच्या कार्याची तसेच धुरंधर यांच्या कला योगदानाची माहिती देताना कलेच्या दस्तावेजीकरणाचे महत्व अधोरेखित केले. व्ही.बी. पाठारे व प्रेमा पाठारे हे राज्यातील महाराष्ट्रातील समर्पित पहिले कलाकार दाम्पत्य होते. त्यांनी काढलेले महात्मा फुले व डॉ आंबेडकर यांची तैलचित्रे विधानभवनात लावली असल्याचे त्यांनी सांगितले. पाठारे यांनी मुंबई ते पेशावर सायकलने परिक्रमा केली होती . देशभरातील नऊ कलारत्नांमध्ये एकट्या बंगालमधील सहा कलाकारांचा समावेश आहे. त्यामध्ये रवींद्रनाथ टागोर, अवनींद्रनाथ टागोर, नंदलाल बोस, जामिनी रॉय यांचा समावेश आहे तसेच अमृता शेरगील व रवी वर्मा यांचा समावेश आहे. परंतु पाठारे, धुरंधर यांच्या कार्याचे दस्तावेजीकरण झाले नसल्याने बॉम्बे स्कूलच्या कार्याची पुरेशी दखल घेतली गेली नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. दहिसरकर यांच्या कार्याचे कौतुक करताना आपण महाराष्ट्रातील लुप्त होत असलेल्या कला व लोककलांच्या जतनाचे कार्य हाती घेतले असल्याचे राज्यपालांनी सांगितले व या कार्यात सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. बंगालच्या कलाकारांना त्रिपुराच्या राजघराण्याने राजाश्रय दिला असल्याचे राज्यपालांनी सांगितले. यावेळी ज्येष्ठ चित्रकार व्ही. बी. पाठारे आणि प्रेमा पाठारे यांचे सुपुत्र वास्तुविशारद शिरीष पाठारे तसेच पॉप्युलर प्रकाशनच्या अस्मिता मोहिते उपस्थित होत्या.

### शाहरा यांनी राज्यपालांची घेतली सदिच्छा भेट

मुंबई (दैनिक संध्या) : उद्योगपती, समाजसेवक आणि ‘न्यूट्रेला’ ब्रँडचे संस्थापक डॉ. दिनेश शाहरा यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची मुंबईतील महाराष्ट्र लोकभवन येथे भेट घेतली. यावेळी त्यांनी राज्यपालांना त्यांच्या ‘लिडिंग फ्रॉम विदिन’ या नव्या पुस्तकाची प्रत भेट दिली. डॉ. शाहरा यांनी राज्यपालांना त्यांच्या माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, आध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर तसेच दलाई लामा यांच्यासोबत झालेल्या अविस्मरणीय भेटींची माहिती दिली. ‘लिडिंग फ्रॉम विदिन’ या पुस्तकामध्ये मूल्याधिष्ठित नेतृत्व, जीवनाचे ध्येय आणि अंतर्मनातील परिवर्तन यांवर आधारित नेतृत्व तत्त्वज्ञान मांडण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी राज्यपालांना उद्योगाच्या माध्यमातून आपण शाश्वत विकास, पर्यावरणीय जबाबदारी आणि विकास प्रक्रियेबाबत कार्य करीत असल्याचे सांगितले.

### तपासणी व विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये कर्करोग, असंसर्गजन्य आजार, रक्ताची कमतरता तसेच हाडांच्या झिजेच्या समस्या वाढत आहेत. ग्रामीण व दुर्बल घटकांपर्यंत प्रतिबंधात्मक व विशेष आरोग्य सेवा वेळेत पोहोचविण्यासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यात १५ जुलै ते २२ जुलै दरम्यान आरोग्य तपासणी आणि विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. राज्यात रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याने रक्तदान शिबिरावर जास्तीत जास्त भर देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. मंत्रालयात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य शिबिर आयोजित करण्यासंदर्भात समिती गठित करण्याबाबत आयोजित बैठकीत मंत्री मुश्रीफ बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, आयुक्त भंडारी, संचालक पल्लवी सापळे उपस्थित होते. तर छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे आणि कोल्हापूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### अमली पदार्थांची तस्करी आणि व्यसनाधीनतेविरुद्ध जनजागृतीची मोहीम

पुणे (दैनिक संध्या) : अमली पदार्थांची वाढती तस्करी आणि तरुणांमध्ये वाढत चाललेली व्यसनाधीनता ही चिंतेची बाब असून, याविरोधात व्यापक जनजागृती आणि प्रभावी उपाययोजना राबविण्याच्या उद्देशाने आनंदवन व्यसनमुक्ती केंद्रातर्फे 'नशामुक्त भारत अभियान' राबविण्यात येणार असल्याची माहिती केंद्राचे अध्यक्ष डॉ. अजय दुधाने यांनी पत्रकार परिषदेत दिली. २६ जून हा जागतिक अंमली पदार्थ सेवन व अवैध वाहतूक विरोधी दिन म्हणून पाळण्यात येतो. या पार्श्वभूमीवर या मोहिमेची सुरुवात शुक्रवार, २६ जून २०२६ पासून पुण्यातील मराठवाडा महाविद्यालय येथे जनजागृती आणि पोस्टर मोहिमेद्वारे करण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेला प्रकल्प समन्वयक निलेश शिंदे उपस्थित होते. डॉ. अजय दुधाने म्हणाले, अमली पदार्थांचे व्यसन ही आता केवळ शहरी समस्या राहिलेली नसून त्याचा फटका पुणे शहरासह आसपासच्या परिसरातील कुटुंबांनाही बसत आहे. सहज उपलब्धता, मित्रपरिवाराचा दबाव आणि जनजागृतीचा अभाव यामुळे अधिकाधिक तरुण व्यसनाधीनतेकडे वळत आहेत. परिणामी कुटुंबे विस्कळीत होणे, शिक्षण अर्धवट सोडणे, मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होणे आणि किरकोळ गुन्ह्यांमध्ये वाढ होणे असे दुष्परिणाम समाजासमोर उभे राहत आहेत. या अभियानांतर्गत अमली पदार्थ विक्रेते आणि तस्करांविरुद्ध कठोर कारवाई, शाळा, महाविद्यालये आणि आयटी कंपन्यांमध्ये नियमित जनजागृती सत्रे, पालकांसाठी समुपदेशन कार्यशाळा, सरकारी व्यसनमुक्ती केंद्रांचा विस्तार, प्रत्येक शहर व तालुक्यात परवडणाऱ्या आणि गोपनीय उपचार सुविधांची उपलब्धता, तसेच स्थानिक स्तरावर 'अमली पदार्थमुक्त क्षेत्र' समित्यांची स्थापना करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

### धोकादायक विद्युत खांबाची जागा बदलण्याची मागणी



नारायणगाव (दैनिक संध्या) : नारायणगाव येथील कॉलेज रोड हा परिसरातील प्रमुख व वर्दळीचा रस्ता असून येथून शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी,स्कूल बस तसेच पोलीस स्टेशन कडे जाणारे नागरिक मोठ्या प्रमाणात ये - जा करतात. सकाळी व संध्याकाळी परिसरातील रहिवासीही या पादचारी मार्गाचा वापर करतात. सखुबाई उमाजी तांबे विद्यालयासमोरील विद्युत खांब हा रस्त्याच्या मधोमध असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून मुख्य विद्युत लाईन असल्यामुळे ओलाव्यामुळे विद्युत प्रवाह उतरण्याची शक्यता नाकारता येत नाही. शाळेतील लहान मुले नकळत या खांबाला स्पर्श करतात, त्यामुळे कोणतेही दुर्घटना घडू नये यासाठी सदर विद्युत खांब तात्काळ स्थलांतरित करण्यात यावा अशी मागणी संबंधित विभागाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी नारायणगावचे उपसरपंच योगेश पाटे, आरीफभाई आतार, गणेश पाटे, हेमंत कोल्हे, नंदू अडसरे, हनुमंत पवार, अक्षय कसाबे उपस्थित होते.

### वर्षा उसगावकर यांच्या हस्ते बालगंधर्वला उद्घाटन संपन्न



नारायणगाव (दैनिक संध्या) : बालगंधर्व रंगमंदिराच्या ५८ वा वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्रातील सर्व कलाकारांचा सन्मान म्हणून दिनांक २४, २५,२६ जून २०२६ या तीन दिवसात अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात पद्मश्री डॉ . मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशन, गॅलेक्सी आय हॉस्पिटल,जे एम रोड यांच्या "डोळ्यांच्या फिरत्या अत्याधुनिक हॉस्पिटलने" सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमाचे उद्घाटन प्रसिद्ध सिनेअभिनेत्री वर्षा उसगावकर तसेच बालगंधर्व परिवार ट्रस्ट व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष श्री मेघराज राजेभोसले यांच्या हस्ते पार पडले. या उपक्रमात १०७ कलाकारांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी आठ कलाकारांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया व ११ कलाकारांना पुढील उपचारांसाठी हॉस्पिटलला पाठविण्यात आले.

# "पत्रकारांचा अवमान योग्य नाही; दिलगिरी व्यक्त करा"

## संजय दिना पाटील यांना शिंदेंचा सल्ला : रोज अर्वाच्य भाषा आणि शिवीगाळ करणाऱ्यांवर शिंदे यांनी व्यक्त केला संताप



पुणे (दै. संध्या)

पत्रकारांबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट भूमिका घेत, पत्रकारांचा अवमान कोणत्याही परिस्थितीत योग्य नसल्याचे सांगितले. खासदार संजय दिना पाटील यांच्याशी चर्चा करून त्यांना माध्यमांची दिलगिरी व्यक्त करण्याचा सल्ला दिल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

यावेळी रोज सकाळी उठून अर्वाच्य भाषा वापरत शिवीगाळ करणाऱ्यांबद्दलही शिंदे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. 'मारून टाका', 'तोडून टाका', 'घरात घुसून मारा' अशा प्रकारची भाषा सातत्याने माध्यमांसमोर वापरली जात असल्याचा उल्लेख त्यांनी केला. मात्र, याबाबत बोलताना त्यांनी कोणाचेही नाव घेतले नाही. अशा प्रकारची भाषा महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला आणि माध्यमांचाही अवमान करणारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिंदे म्हणाले, "संजय दिना पाटील यांनी केलेल्या वक्तव्याची मी माहिती घेतली आहे. त्यांच्याशी माझी चर्चा झाली. त्यांनी स्पष्ट सांगितले की, पत्रकारांबद्दल कोणतेही अपशब्द वापरण्याचा किंवा त्यांच्या भावना दुखावण्याचा त्यांचा हेतू नव्हता. पत्रकारांशी माझे नेहमीच चांगले संबंध राहिले आहेत, असे त्यांनी मला सांगितले."

मात्र, सातत्याने काहीजण माध्यमांसमोर अत्यंत अर्वाच्य आणि खालच्या दर्जाची भाषा वापरत असल्याबद्दल संजय दिना पाटील यांनी माझ्याकडे व्यथा बोलून दाखवली. त्याचा राग त्यांच्या मनात आहे. पत्रकारांबद्दल मला काहीही वाईट बोलायचे नव्हते, असे त्यांनी मला सांगितल्याचे शिंदे म्हणाले.

"रोज सकाळी 'मारून टाका', 'तोडून टाका', 'घरात घुसून मारा' अशा प्रकारची भाषा काही लोक माध्यमांसमोर वापरत आहेत. अशा प्रकारचे वक्तव्य केवळ राजकीय संस्कृतीलाच नाही, तर माध्यमांचाही अपमान करणारे आहे," असे शिंदे म्हणाले.

संजय दिना पाटील यांच्या मनात पत्रकारांविषयी कोणताही राग किंवा द्वेष नसल्याचे सांगत, अशा प्रकारची वक्तव्ये भविष्यात टाळण्याचा सल्लाही आपण दिल्याचे शिंदे म्हणाले. "आपल्याकडून काही चुकीचे शब्द गेले असतील, तर माध्यमांची दिलगिरी व्यक्त करा, असे मी त्यांना स्पष्टपणे सांगितले," असे त्यांनी नमूद केले. यावेळी शिंदे यांनी संजय दिना पाटील यांच्याशी झालेल्या चर्चेचाही उल्लेख केला. "रोज माझ्यावर आणि माझ्या कुटुंबीयांवर आरोप केले जात आहेत.घरच्यांबद्दलही अपमानास्पद भाषा वापरली जाते. हे अत्यंत निंदनीय आहे, अशी भावना त्यांनी माझ्यासमोर व्यक्त केली," असे शिंदे म्हणाले.

"२०२२ पासून अशा प्रकारची भाषा आणि वक्तव्ये महाराष्ट्र पाहत आहे. हा लोकशाहीवर विश्वास ठेवणारा महाराष्ट्र आहे. आया-बहिणींचा उद्धार करणारी, खालच्या पातळीची भाषा वापरणे कोणालाही शोभणारे नाही," असेही शिंदे यांनी ठणकावले. शेवटी शिंदे म्हणाले, "संजय दिना पाटील यांनी मला सांगितले आहे की, माझ्याकडून नकळत काही अपशब्द गेले असतील, तर मी माध्यमांची मनापासून दिलगिरी व्यक्त करेन." पत्रकारांबाबतच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत असताना, या संपूर्ण प्रकरणात पत्रकारांचा सन्मान राखण्याची भूमिका घेत शिंदे यांनी संबंधितांना संयमित भाषा वापरण्याचे आवाहन केले.




## आदर्श मुख्याध्यापकांचा गौरवशाली सेवापूर्ती सोहळा संपन्न

नारायणगाव (दै. संध्या)

कुलस्वामी खंडेराय विद्यालय, हिवरे तर्फे नारायणगाव या विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक श्री ताबाजी भाऊसाहेब वागदरे यांनी तब्बल 32 वर्षे मुख्याध्यापक म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी व समाज उघडण्यासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित गौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी उपस्थित असलेल्या जिल्हा परिषद सदस्या नेहा बापू पाटे यांनी श्री.वागदरे सरांच्या प्रदीर्घ व प्रेरणादायी कार्याचा गौरव करत त्यांच्या शैक्षणिक,सामाजिक व संस्कारक्षम योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी केलेले कार्य सदैव प्रेरणादायी राहील, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## खेड-शिवापूर आरोग्य केंद्रातील औषध वितरणात निष्काळजीपणा उघड

### आरोग्य केंद्रात चूक महागात

पुणे (दै. संध्या)

खेड-शिवापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात मुदतबाह्य औषधांचे वितरण केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या प्रकरणाची दखल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी घेतली असून त्यांनी या औषध निर्माण अधिकाऱ्याची (फार्मासिस्ट) वेतनवाढ रोखण्याची शिक्षा सुनावली आहे. चौकशी समितीच्या अहवालात दोषी आढळून आल्याने ही कारवाई केली आहे. खेड-शिवापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना औषधे वाटप करताना निष्काळजीपणा झाल्याचा आरोप नागरिकांनी केला होता. संबंधित प्रकाराचा व्हिडिओही समोर आला होता. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने समिती नेमून चौकशी केली.

यात प्राथमिक आरोग्य केंद्रातील एका रुग्णाला मार्च २०२६ मध्ये मुदतबाह्य झालेल्या 'ॲम्लोडीपिन ५ एमजी' या रक्तदाब कमी करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या औषधाचे वितरण झाल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी औषध निर्माण अधिकारी वैशाली कराळे यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली. या अहवालानंतर गजानन पाटील यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) अंतर्गत कराळे यांची 'एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता रोखण्यात येत आहे' अशी



शिक्षा सुनावली आहे. दरम्यान, रुग्णांच्या आरोग्याशी संबंधित या प्रकारामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, शासकीय आरोग्य केंद्रांमधील औषधसाठा आणि वितरण व्यवस्थेची नियमित तपासणी करण्याची मागणी होत आहे. प्रशासनाने संबंधित प्रकरणाची चौकशी पूर्ण करून कारवाई केल्याने या घटनेवर पडदा पडला असला, तरी भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी अधिक दक्षता घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## स्वान रिसर्च फाऊंडेशनच्या नॉलेज नेक्स्ट 'नासा ट्रेनिंग प्रोग्राम' निवडीसाठी सप्टेंबरमध्ये परीक्षा

### स्पेस एज्युकेशन संदर्भात शालेय स्तरावरील भारतातील पहिलाच प्रयोग

पुणे (दै. संध्या)

अमेरिकेतील नॅशनल एरोनोटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशनच्या (नासा) सहकार्याने हन्टस्वीले, अल्बामा येथे उभारलेल्या यूएस स्पेस अँड रॉकेट सेंटरमधील 'नासा'च्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी (नासा ट्रेनिंग प्रोग्राम) महाराष्ट्रात घेण्यात येणारी निवड चाचणी परीक्षा सप्टेंबर 2026 मध्ये होणार आहे. भारतामध्ये स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनच्या वतीने घेण्यात येणार आहे.. इयत्ता 6 वी ते 12 वी च्या मुलांना ही परीक्षा देता येणार असून, या परीक्षेसाठी अर्ज करण्याची मुदत 29 जुन 2026 ते 31 ऑगस्ट 2026 असल्याची माहिती स्वान फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.




यावेळी सचिव विकास टाकळीकर , कोषाध्यक्ष अक्षय खोब्रागडे, सहसचिव गौरव सोमवंशी,प्रसाद भोपळे, अमन पाचघरे आणि संकेत जैन आदी उपस्थित होते.

शशिकांत कांबळे म्हणाले , "स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशन वतीने भारतामध्ये पहिल्यांदाच 2023 ला ट्रेनिंग प्रोग्रामच्या निवडीसाठी महाराष्ट्रामध्ये इ. ६ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यासाठी परिक्षा घेण्यात आली त्या परीक्षे नंतर काही विध्यार्थीना आलाबमा सेंटर व सिंगापूर सायन्स सेंटर ला घेऊन. जाण्यात आले. यावर्षी 2 री नॉलेज नेक्स्ट परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका असेल. प्रामुख्याने गणित, विज्ञान, भूगोल, बुद्धिमापन यावर आधारित प्रश्नपत्रिका असेल. यामुळे विद्यार्थी चाकोरीबाहेर जाऊन विषयांचा अभ्यास करणार आहेत. शिवाय अंतराळविषयक संशोधन, प्रात्यक्षिके यांचा अभ्यास त्यांना विद्यार्थीदशेत करायला मिळणार असून, येणाऱ्या पिढीसाठी हे महत्वाचे आहे."

विकास टाकळीकर म्हणाले, "ही परीक्षा महाराष्ट्रातील इंग्रजी, सेमी इंग्रजी माध्यमातील शाळांसह जिल्हा परिषद, महानगपालिका, नगरपालिका शाळांचाही समावेश आहे. या परीक्षेसाठी 29 जून पासून नावनोंदणी करता येणार आहे. 30 ऑगस्ट 2026 पर्यंत नावनोंदणी सुरु राहील. या परीक्षेतून निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांचा ऑक्टोंबर सत्कार होणार आहे. जानेवारी आणि फेब्रुवारी मध्ये युएस स्पेस अँड रॉकेट सेंटर, हन्टस्वीले, अल्बामा आणि सिंगापूर सायन्स येथे विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी नेण्यात येईल. अमेरिकेतील स्पेस कॅम्प, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, ऑरलॅन्डो या ठिकाणीही विद्यार्थ्यांना घेऊन जाण्यात येणार आहे. ."

अक्षय खोब्रागडे म्हणाले, "आज पालक आपल्या मुलाने अनेक रिॲलिटी शोमध्ये सहभागी व्हावे, याकरिता अनेक प्रयत्न करताना दिसतात. परंतु ही परीक्षा अंतराळ एज्युकेशनच्या दृष्टीने खूप महत्त्वाची असेल." यावेळी फाउंडेशन चे CEO प्रसाद भोपळे म्हणाले यापरीक्षेचे पहिले पारितोषिक आलाबमा येथील स्पेस सेंटर आणि दुसरे पारितोषिक सिंगापूर सायन्स सेंटर स्टडी टूर असे असणार आहे. अधिक माहितीसाठी https://swanrsfoundation.com/swan या संकेतस्थळास भेट द्यावी किंवा +91 84848 72392 या क्रमांकावर संपर्क साधावा असे अवाहन स्वान रिसर्च फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

"आज संपूर्ण जग विकासाच्या वाटेवर आहे. माणूस पृथ्वीपुरताच मर्यादित न राहता अवकाशातही प्रवास करू लागला आहे. चंद्र, मंगळ हे ग्रह तर मानवाच्या अगदी ओळखीचे झाले आहेत. अंतराळासंबंधित प्रयोग, अभ्यास आणि संशोधन हे प्रत्येक देश स्वतःच्या पद्धतीने करत असतो. संबंधित संशोधनासाठी अनेक देशांनी स्वतःची अंतराळ संस्था (Space Agency) तयार केली आहे. जगातील १९५ देशांपैकी फक्त ७२ देशांकडे स्पेस एजन्सी आहेत. 'नासा' ही त्यापैकी सर्वांत सुप्रसिद्ध एजन्सी आहे. तीस वर्षांपूर्वी डॉ. वॉन ब्राऊन यांनी विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरच खगोलशास्त्रात रुची निर्माण व्हावी आणि या माध्यमातून प्रात्यक्षिक दाखवता यावीत, यासाठी यूएस स्पेस अँड रॉकेट सेंटर सुरु केले."

## पहिलं बुकिंग, पहिली साथ अन् महिनाभर दिलेली साऊंड सिस्टिम

### बालगंधर्व-मेलडी मेकर्सचे ऋणानुबंध उलगडले

पुणे (दै. संध्या)

बालगंधर्व रंगमंदिराच्या इतिहासातील एक अनोखा किस्सा... या रंगमंदिरातील पहिलं बुकिंग होतं मेलडी मेकर्सचं! इतकंच नाही, तर साऊंड सिस्टिम नसलेल्या सुरुवातीच्या काळात तब्बल महिनाभर मेलडी मेकर्सचीच साऊंड सिस्टिम येथे वापरण्यात आली. पहिलं बुकिंग, पहिली साथ आणि महिनाभर दिलेली साऊंड सिस्टिम. हा जिव्हाळ्याचा प्रवास उलगडला संस्थापक अशोककुमार सराफ यांनी.

बालगंधर्व परिवार ट्रस्ट आणि पुणे महापालिकेच्या वतीने अलविरा मोशन एंटरटेन्मेंट प्रस्तुत बालगंधर्व मंदिराचा ५८ व्या वर्धापन दिनानिमित्त मेलडी मेकर्सचे संस्थापक अशोक कुमार सराफ यांना बुधवारी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यावेळी पुरस्काराला उत्तर देताना त्यांनी बालगंधर्व रंगमंदिराशी (Balgandharva ) जुळलेल्या ऋणानुबंधांचा प्रवास उलगडून दाखवला. अशोक कुमार सराफ यांनी मेलडी मेकर्स'च्या माध्यमातून सिनेसंगीत रसिकांच्या मनावर त्यांनी गेली काही दशके अधिराज्य गाजवले आहे.

माजी आमदार उल्हास पवार अध्यक्षस्थानी होते. उपमहापौर परशुराम वाडेकर, ज्येष्ठ गायक आनंद शिंदे, सूर्यदत्ता इन्स्टिट्यूटचे प्रमुख डॉ संजय चोरडिया, भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे,अभिनेते सुशांत शेलार,अभिनेत्री वर्षा उसगांवकर ( Varsha Usgaonkar ) 'बालगंधर्व परिवारा'चे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, 'अलविरा मोशन एंटरटेन्मेंट'च्या दीपाली कांबळे, ॲड. मंदार जोशी आदी या वेळी उपस्थित होते. कलाप्रेमामुळे एकत्र आलेल्या शाळकरी मित्रांचा पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी झालेला पहिला कार्यक्रम ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचा 'मेलडी मेकर्स' हा वाद्यवृंद, हा प्रवास सराफ यांनी कथन केला. 'ज्या काळात ऑर्केस्ट्रा म्हणजे हिंदी चित्रपट संगीताची भ्रष्ट नक्कल असे समजले जात होते, त्या काळात अशोककुमार सराफ आणि प्रमिला दातार यांनी ऑर्केस्ट्रा या प्रकाराला प्रतिष्ठा आणि सन्मान मिळवून दिला,' असे वर्षा उसगांवकर यांनी नमूद केले.




'बालगंधर्व रंगमंदिराचा पुनर्विकास स्वागतार्ह आहे. कलाकार म्हणून आमच्याकडून त्याला कोणतीही आडकाठी नाही. मात्र, हा पुनर्विकास कलाकारांना विश्वासात घेऊन केला जावा,' अशी अपेक्षा राजेभोसले यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ लोककलावंत पद्मश्री रघुवीर खेडेकर, 'लोकसत्ता'चे वरिष्ठ बातमीदार विद्याधर कुलकर्णी, सागर आव्हाड, विजय जगताप, राज देशमुख, गायिका सावनी दातार-कुलकर्णी,अलविरा झरेकर, चित्रपट निर्माते दत्ता दळवी, मंगेश मोरे, डॉ. गौरव घोडे, लेखक व दंत चिकित्सक डॉ. आशुतोष जावडेकर यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शोभा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. अनिल गुंजाळ यांनी आभार मानले.

